LIVE पार्श्वभूमी बीड पोर्टलसाठी
तालुका, शहर व गावनिहाय
प्रतिनिधी नेमणे आहे
संपर्क : दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड.
संपादक गंमत भंडारी
9422295333
8623880100

# पार्श्वभूमी

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.
50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड, बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३६ वे अंक ७६ वा फोन २३०१०१ दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ शुक्रवार | गंमत भंडारी | ई-पेपर : www.parshvbhumi.com | Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 | पाने ६ किंमत ४रु.

# गेवराई ते नागपूर एमआरजीसतील भ्रष्टाचाराची चैन
# मोहगणी वृक्ष लागवडीमध्ये कोट्यावधींचा घोटाळा


राजेंद्र मोटे (तक्रारदार)

**बीड दि.१२ (प्रतिनिधी):– पैसा बोलता है असे म्हणतात, ते खरं आहे. गेवराई तालुक्यातील एमआरजीएस योजनेमध्ये मोहगणी वृक्ष लागवडीत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून यात सरपंचांना बाजुला ठेवून ग्रामसभेला फाटा देऊन बीडीओ कांबळे मॅडम, एपीओ माळवदकर, जोगदंड, ऑपरेटर तौर, मस्के, येवले, जोगदंड, मिसाळ, अकाऊंटंट सय्यद, अभियंता कोल्हे, बागलाने, ढाकणे, वदक या सर्वांनी मिळून थेट गेवराई ते नागपूर अशी चैन निर्माण करुन जवळपास ४०० फाईल तयार केल्या, ज्यात ऑनलाईन प्रोसेस राबविली नाही. विशेष म्हणजे सरपंच, ग्रामसेवक, रोजगार सेवक यांना कुठलीही खबर नसतांना या फाईल मंजूर झालेल्या आहेत आणि कोट्यावधी रुपये उचलण्यात आलेले आहेत. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे राजेंद्र मोटे यांनी विभागीय आयुक्तांकडे केली आहे.**

राजेंद्र मोटे यांनी विभागीय आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेवराई तालुक्यामध्ये एमआरइजीएस योजनेमध्ये मोहगणी वृक्ष लागवड योजनेत रोजगार हमी कायदा बाजुला ठेवून खोटे कागदपत्र तयार करुन अनेक संचिका नसतांनाही सरपंच, ग्रामसेवक, रोजगार सेवक यांच्या परस्पर ऑपरेटर, पीटीओ, एपीओ, अकाऊंटंट आणि बीडीओ यांनी खोटे लाभार्थी पुढे करुन मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला आहे. या संदर्भात दि.१४-१०-२०२५ रोजी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदन देण्यात आले होते. मात्र कारवाई झालेली नाही. त्यामुळे विभागीय आयुक्तांकडे या संदर्भात निवेदन देण्यात आले आहे.

मोहगणी वृक्ष लागवडीमध्ये गेवराईतील या सर्व अधिकाऱ्यांनी संगनमत करुन भ्रष्टाचार केला आहे. मोहगणी वृक्ष लागवडीची एकाही कामाची संचिका नाही, एम.बी. नाही. वर्ककोड हे अभिसारणमधून एकाच वेळी ४० ते ५० काढले. एकाच ठिकाणी बसून जिओ टॅग करण्यात आले, कुशल, अकुशलचा रेशो पाळला नाही. जसे की फक्त एकाच लेबरचे एक दिवसाचे ११८८ रुपयांचे मस्टर काढले व नंतर थेट ५ लाख रुपये कुशल निधी दिलेला आहे. मोहगणी वृक्ष लागवडीसाठी सगळीकडे ५ लाखाचे इस्टीमेट असतात परंतु गेवराईमध्ये अनेक फाईली ७ लाख रुपयांच्या करण्यात आले असून यातून पूर्ण कुशल बिल उचलण्यात आले आहे. अशा जवळपास ३०० ते ४०० फाईल तयार करण्यात आलेल्या आहेत. त्यात एकही मूळ संचिका नाही, ऑनलाईन प्रक्रिया राबविलेली नाही. सरपंच, ग्रामसेवक, रोजगार सेवक यांच्या परस्पर थेट हे उद्योग करण्यात आलेले आहेत. ग्रामसेवक, सरपंच आणि रोजगार सेवकांनी लेखी दिलेले आहे की ही कामे आमच्या परस्पर झालेली आहेत. मूळ यंत्रणेला बाजुला ठेवून या फाईली करण्यात पान २ वर

## आ.विजयसिंह, बदामराव, बाळराजे या भ्रष्टाचाराकडे जरा लक्ष द्या





**गेवराई तालुक्यात एमआरजीएस कामात मोहगणी वृक्ष लागवडीमध्ये नियमाला फाटा देऊन होत असलेल्या कोट्यावधी रुपयांच्या भ्रष्टाचाराकडे आ.विजयसिंह पंडित, माजी मंत्री बदामराव पंडित, बाळराजे पवार यांनी लक्ष देण्याची गरज आहे. अधिकारी मनमानी पद्धतीने नियमांना फाटा देत कोट्यावधी रुपये उचलत आहेत. गोरगरीब जनता त्यांच्या फाईलीसाठी वारंवार चकरा मारत आहे, मात्र त्यांच्या फाईली मंजुर होत नाहीत पण अधिकारी स्वत:च्या मर्जीतील लोकांची नावे टाकून करोडो रुपयांचा भ्रष्टाचार करत आहेत. चांगल्या योजनेला हरताळ फासत आहेत. याकडे लोकप्रतिनिधी म्हणून या सर्वांनी लक्ष देण्याची गरज आहे.**



## आधी अकुशल थोडे काम दाखवायचे आणि नंतर कुशल वर्क लाखो रुपये उचलायचे

मोहगणी वृक्ष लागवडीत धोंडराईत नवनाथ विष्णू घोडके यांच्या कामाचे अकुशलचे १७८२ रुपयांचे काम दाखविले आणि त्यानंतर लगेचच ३ लाख ५९ हजार २२९ रुपये कुशल काम दाखवून उचलले. कटचिंचोलीत सुंदर शिवाजी बोंबले यांचे अकुशल काम २९७ रुपयांचे दाखविले आणि लगेचच कुशल काम ३ लाख ६२ हजार २९७ रुपयांचे दाखविण्यात आलो आहे. भेंडखुर्दमध्ये सलकीराम दादाराव तांबुरे यांचे अकुशलचे काम ५९४ रुपयांचे दाखविण्यात आले आणि कुशल कामाचे ४ लाख ९५ हजार ६९४ रुपये उचलण्यात आलेले आहेत. असे एक एक मस्टर काढुन कुशलचे पैसे मोठ्या प्रमाणात उचलण्यात आलेले आहेत. ही सर्व चैन गेवराई ते नागपूर अशी आहे. या प्रकरणात तालुक्यातील राजकीय पुढाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे.

## या गावात झाली नियमबाह्य कामे

**संघटीतरित्या भ्रष्टाचाराचा नमुना कसा असतो हे मोहगणी वृक्ष लागवडीच्या गेवराई तालुक्यातील प्रकारावरुन दिसून येते. फक्त कागदोपत्री रेकॉर्ड करुन बिले उचलली गेली, यामध्ये तलवाडा १२, अर्धमसला १३, कोल्हेर ११, बोरगाव २२, रेवकी ८, लुखामसला १४, काठोडा ७, कटचिंचोली २०, अंतरवली १५, गंगावाडी ५, धोंडराई १४, मिरगाव ५, ढालेगाव १०, सावळेश्वर १२, मोटेगाव १५, भोजगाव ५, नांदलगाव ८, मुळूकवाडी १०, गोंदी ८, गोपतपिंपळगाव ७, भोगलगाव ७, भेंडखुर्द ४, गौंडगाव ४ ही गावांची नावे आहेत. एमआरजीएसमध्ये अनेक वर्षापासून लोक फाईल करुन चकरा मारत आहेत मात्र त्यांनी पैसे न दिल्यामुळे त्यांच्या** पान २ वर

---

### माजलगावचे उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, ना.तहसीलदार पाळवदे यांच्यामुळे
# १५ ऊसतोड मजुरांची सुटका



माजलगाव दि१२.(तुकाराम येवले) धारूर तालुक्यातील एका व्यक्तीने उत्तर प्रदेशातील कांही मजुरांना ऊसतोड मजुर म्हणुन आणुन त्यांना कुठलाच मोबदला न देता त्यांना सतत मारहाण करून डांबून ठेवत त्यांच्याकडून काम करून घेतले. याप्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांना माहिती समजताच त्यांच्या आदेशाने माजलगावचे उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले व धारूरचे नायब तहसीलदार सुरेश पाळवदे यांनी बुधवारी सायंकाळी त्या व्यक्तीच्या ताब्यातुन सर्वच ऊसतोड मजुरांची मुक्तता करून, त्या व्यक्तीच्या विरोधात दिंद्रुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.
या संदर्भात अधिक माहिती अशी की, धारूर तालुक्यातील आम्ला-हिंगणी बु.येथील ओम चंद्रकांत सोळंके याने पान २ वर

## इंगोले व पाळवदे यांची विशेष कामगिरी

ओम सोळंके नामक व्यक्तीने युपीच्या मजुरांना डांबून ठेवत त्यांच्याकडून जनावरांप्रमाणे विना मोबदला काम करवून घेत असुन, त्याच्या तावडीतून सर्व मजुरांची मुक्तता करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी देताच माजलगावचे उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करून, त्यात धारूरचे नायब तहसीलदार सुरेश पाळवदे, मंडळ अधिकारी लहु केदार, मंडळ अधिकारी सोपान वाघमारे संबंधित तलाठी यांच्या पथकाने दिंद्रुड पोलीसांच्या मदतीने धडाकेबाज कारवाई करत बुधवारी रात्री ओम सोळंके यांच्या तावडीतून सर्व मजुरांची मुक्तता केली.

---

## आरोग्याचे कारण दाखवून सुरेश, अर्चना कुटे रुग्णालयात




बीड दि.१२ (प्रतिनिधी):- प्रकृत्ती अस्वास्थाचे कारण दाखवून ज्ञानराधा पतसंस्थेतील कोट्यावधी रुपयांच्या गैरव्यवहार प्रकरणातील आरोपी सुरेश कुटे व अर्चना कुटे यांना जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मात्र यामुळे ठेवीदारांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे.
ज्ञानराधा मल्टीस्टेटमध्ये गोरगरीब लोकांच्या कोट्यावधी रुपयांच्या ठेवी अडकून पडल्या आहेत. अनेक स्तरावर हा प्रश्न मांडला गेला. मात्र अद्यापही ठेवी परत मिळालेल्या नाहीत. राज्य सरकार, केंद्र सरकारनेही या प्रकरणात लक्ष घातले परंतु ठोस निर्णय झाले नाहीत. कुटे दाम्पत्य सध्या जेलमध्ये आहे. मात्र या ना त्या कारणावरुन सवलती मागितल्या जात आहेत. प्रकृतीच्या कारणावरुन त्यांना आता जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलेले आहे. पान २ वर

---

### गतीरोधक काढतांना नगर सेवकांनी आडवे येऊ नये
# गणेश नगरातील एकाच गल्लीतील तीन गतीरोधक बीड न.प.ने हटविले



बीड दि.१२ (प्रतिनिधी):- शहरातील विविध भागामधील गतीरोधक काढण्याचे काम नगर पालिकेने हाती घेतले आहे. सारडा नगरी, सहयोगनगर, कृष्ण मंदिर रस्ता येथील गतीरोधक काढल्यानंतर काल गणेश नगर भागातील एका छोट्या रस्त्यावर असलेले तीन गतीरोधके नगर पालिकेने काढून टाकली. सार्वजनिक रस्त्यावर खाजगी व्यक्तिंना गतीरोधके करता येत नाहीत. परंतु बीडमध्ये असे अनेक प्रयोग झालेले आहेत ज्याचा शोध घेऊन नगर पालिका ते काढत आहे.
शहरातील गणेश नगर भागात १० ते १२ फुटाच्या गल्लीत अवघ्या २० -२५ फुटाच्या अंतराने ३ गतीरोधके होती, जी नगर पालिकेने काल काढली. काही जणांनी याला विरोधही केला परंतु अशी गतीरोधके टाकता येत नाहीत. गतीरोधके टाकतांना त्याची उंची, रस्त्यावरील वाहतुकीची वारंवारता या सर्व गोष्टी पाहिल्या जातात. नवीन नियुक्त झालेल्या नगर सेवकांनी गतीरोधके काढत असतांना नगर पालिकेच्या पथकावर दबाव आणू नये अथवा अडथळे निर्माण करु नयेत. अनेक वेळा चुकीच्या कामाचे समर्थन नगर सेवकांकडून होत आहे ही बाब योग्य नाही. पान २ वर

---

# नगरसेवकांनी जनतेला वेळ द्यावा, तरच तुमच्या पदाला अर्थ आहे -माजी आ.लक्ष्मण पवार



### शहरातील अतिक्रमण धारकांना पीटीआर प्रश्नी मा.आ.लक्ष्मण पवार, बाळराजेंच्या उपस्थित नगर परिषद सभागृहात पार पडली आढावा बैठक

गेवराई दि. १२ (प्रतिनिधी):- हक्काची जागा आणि अतिक्रमण धारकाच्या जागेवर नियमात घरकुल आवास योजनेंतर्गत लाभ मिळवून देण्यासाठी सामूहिक प्रयत्न करण्याची गरज आहे. नवनिर्वाचित नगरसेवकांनी स्वच्छता, पाणी आणि घरकुल, या तीन गोष्टींवर लक्ष देऊन, योजना पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, त्याचा पाठपुरावा करून, लाभधारकांना लाभ मिळवून द्यावा, असे आवाहन माजी आमदार लक्ष्मण पवार यांनी येथे बोलताना केले.
गेवराई नगर परिषदेच्या सभागृहात गुरूवार ता. १२ रोजी माजी आमदार लक्ष्मणराव पवार, बाळराजे पवार, मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, रेवतीताई घुंबार्डे, ॲड. राजेंद्र राक्षसभुवनकर यांच्या प्रमुख उपस्थितीत घरकुल आवास योजनेची आढावा बैठक पार पडली. बैठकीत गेवराई शहरातील घरकुल आवास योजनेंतर्गत मंजूर, नामंजूर करण्यात आलेल्या विषयावर चर्चा करण्यात आली. या योजनेंतर्गत पान २ वर

## वॉल्वमन शेख ताहेर यांचे निधन

बीड दि.१२ (प्रतिनिधी):- येथील नगर पालिकेतील वॉल्वमन शेख ताहेर यांचे हृदयविकाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.



शेख ताहेर यांना रक्तदाबाचा त्रास होता, घरची परिस्थितीही हलाखीची असल्यामुळे ते उपचार घेऊ शकले नाहीत. आर्थिक ताणामुळे आरोग्यावर परिणाम झाला व त्यात त्यांचे निधन झाले. ताहेरभाई अत्यंत मनमिळावू स्वभावाचे होते. पाणी पुरवठ्यामुळे नागरिकांशी त्यांचे सलोख्याचे संबंध होते. त्यांच्या निधनाची बातमी कळाल्यानंतर स्वच्छता सभापती शेख निजाम, गटनेते फारुक पटेल, खुर्शीद आलम, खय्युम इनामदार, रईस, पाणी पुरवठा सुपरवायझर अब्दुल हदी व सर्व कर्मचारी यांनी तातडीने भेट दिली. शहेनशाहवली कब्रस्तान या ठिकाणी दफणविधी झाला. वॉल्वमन शेख ताहेर यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असून दानशूर व्यक्तिंनी त्यांच्या कुटुंबियास आर्थिक मदत करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

## बीड सार्वजनिक शिवजयंती जन्मोत्सव समितीच्या अध्यक्षपदी नितीन लांडे पाटील

### या वर्षी शिवजयंती उत्सव साधेपणाने साजरा करणार



बीड दि.१२ (प्रतिनिधी):- प्रतिवर्षा प्रमाणे यावर्षी ही १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती साजरी होत आहे. चंपावती नगरी (बीड) येथील शिवजयंती उत्सव बीडचे आ.संदीपभैया क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिवर्षी उत्साहात साजरा होत असतो प्रतिवर्षी या उत्साहामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम, पारंपारिक कला, लेझीम पथक, चित्त थरारक प्रात्यक्षिके, ढोल पथक, लेझर शो, तसेच वेगवेगळ्या प्रांतातील कलाकारांचा सहभागाने बीडच्या या जन्मोत्सव सोहळ्याची महाराष्ट्रात खूप चर्चा आहे; परंतु यावर्षी बीडचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनामुळे यावर्षी शिवजयंती उत्साहात न साजरी करता एकदम साधेपणाने साजरी करण्याचे आ. संदीपभैया क्षीरसागर व मागील वर्षाच्या शिवजयंती उत्सव समितीच्या कार्यकारणीच्या बैठकीमध्ये सर्वानुमते ठरले.
दि. १२ फेब्रुवारी २०२६ गुरुवार रोजी शासकीय विश्राम गृह बीड येथे नवीन कार्यकारणीच्या स्थापनेच्या वेळेस मा. आ.संदीपभैया क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षीच्या शिवजयंती जन्मोत्सव साठी नितीन उर्फ पप्पू गंगाधर लांडे (पाटील) यांची सर्वानुमते निवड करण्यात आली, तसेच उपाध्यक्षपदी सिद्दिकी फारुकी व पान २ वर

## एनए परवानगी इतिहासजमा; बांधकाम नकाशा हीच परवानगी समजणार

मुंबई दि.१२ (प्रतिनिधी):- शेतजमिनीच्या निवासी, व्यावसायिक किंवा औद्योगिक वापरासाठी लागणारी बिनशेती अथवा अकृषिक (एन.ए.) परवानगीची अट आता कायमची रद्द करण्यात आली आहे. राज्य सरकारने त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार कमी करून ते थेट स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत. त्यानुसार नगररचना विभाग आणि स्थानिक प्राधिकरणाने दिलेली बांधकाम नकाशा परवानगी हीच 'एनए' परवानगी असणार आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र बांधकाम परवानगीची गरज नाही. याशिवाय वार्षिक बिनशेती करदेखील रद्द करून राज्य सरकारने शेतजमीनधारकांना मोठा दिलासा दिला आहे. पान २ वर

पाहिजेत
नाथ ज्यूस सेंटर
सागर स्वीट होमच्या शेजारी, सुभाष रोड, बीड
येथे कामासाठी मुले पाहिजेत
आकर्षक पगार दिला जाईल
:: संपर्क :: 9822394939
P.P.

पाहिजेत
2 रिसेप्शनिष्ट
3 साफसफाई कर्मचारी
(रुम सर्व्हीस)
गरजुंनी संपर्क करावा.
: भेटण्याची वेळ : दु.12.00 ते 4.00
हॉटेल साई पॅलेस
जालना रोड, बीड.
16547

# धर्मांतर केले किंवा आंतरजातीय विवाह, व्यक्तीची जात बदलत नाही

अलाहाबाद दि.१२ (वृत्तसेवा):- एखादी व्यक्ती धर्म बदलू शकते; मात्र धर्मांतर करूनही त्याची जात कायम राहते. म्हणून, लग्नामुळे व्यक्तीची जात बदलत नाही. महिलेने आंतरजातीय विवाह केला तरी जन्माच्या वेळी असणारी तिची जात कायम राहते असे महत्त्वपूर्ण निरीक्षण अलाहाबाद उच्च न्यायालयाने नोंदवले.
आरोपींनी आपल्याला मारहाण केली, शिवीगाळ केली आणि वादादरम्यान जातीवाचक शब्दांचा वापर करून अपमानित केले, असा आरोप तक्रारदार महिलेने केला होता. मारहाणीत स्वत:सह इतर दोन जण जखमी झाल्याचा दावा तिने केला होता. या प्रकरणी ९ संशयित आरोपींवर गुन्हे दाखल झाले. यानंतर अलीगडमधील विशेष (अनुसूचित जाती-जमाती प्रतिबंधक कायदा) न्यायालयाने या आरोपींविरुद्ध भादंवि कलम ३२३, ५०६, ४५२, ३५४ आणि अनुसूचित जाती-जमाती प्रतिबंधक कायद्याच्या कलम ३(१)(आर) अंतर्गत खटला चालवण्यासाठी संशयित आरोपींविरोधात समन्स जारी केले होते. या कारवाईला संशयितांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. यावर न्यायमूर्ती अनिल कुमार-दहावे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. संशयितांच्या वकिलांचा युक्तिवाद तक्रारदार महिला मूळची पश्चिम बंगालमधील आहे. ती जन्माने अनुसूचित जाती/जमाती प्रवर्गातील असली, तरी तिने 'जाट' समाजातील व्यक्तीशी विवाह केला आहे. विवाहामुळे तिचे जातीचे अस्तित्व संपुष्टात आले आहे. विवाहानंतर महिला पतीच्या जातीची मानली जाते आणि तिची जन्माची जात बदलते, त्यामुळे अनुसूचित जाती-जमाती कायद्यांतर्गत गुन्हा लागू होऊ शकत नाही असा युक्तिवाद संशयित आरोपींच्या वकिलांनी केला होता. तसेच, पूर्ववैमनस्यातून खोटी तक्रार दाखल केल्याचाही दावा केला होता. सरकारी वकिलांनी या युक्तिवादाला विरोध केला. दोन्ही पक्षांनी दाखल केलेले गुन्हे एकाच दिवशी घडल्याने हा केवळ पूर्ववैमनस्यातून तक्रार दाखल केली असे म्हणता येणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.
जात बदलत नाहीच : उच्च न्यायालय
न्यायमूर्ती अनिल कुमार-दहावे यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की व्यक्तीने धर्म बदलला तरी तिची जात बदलत नाही. त्याचप्रमाणे, विवाह झाल्यामुळे एखाद्या महिलेची जन्माने मिळालेली जात बदलली जात नाही. त्यामुळे आरोपींचा हा युक्तिवाद कायद्यात टिकणारा नाही, असे स्पष्ट करत तक्रारदार महिला आणि साक्षीदारांचे जबाब, वैद्यकीय अहवाल विचारात घेतल्यानंतरच सत्र न्यायालयाने अपीलकर्त्यांना समन्स बजावले होते. तसेच, परस्परविरोधी खटल्याचे अस्तित्व हे विरोधी पक्षाने प्रतिस्पर्ध्याच्या बाजूने दाखल केलेली तक्रार रद्द करण्याचा आधार बनत नाही, असे नमूद करत कारवाई रद्द करण्यात यावी, अशी मागणी करणारे अपील उच्च न्यायालयाने फेटाळून लावले.

# देशात ३० कोटी कामगारांचा एल्गार

नवी दिल्ली दि.१२ (वृत्तसेवा):- केंद्र सरकारच्या कामगार आणि शेतकरी विरोधी धोरणांविरोधात ३० कोटी कामगारांनी देशव्यापी संप पुकारला आहे. वीज, बँकिंग, विमा आणि वाहतूक यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांतील कर्मचारी या आंदोलनात सहभागी झाल्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. नवीन श्रम कायदे, वीज खासगीकरण आणि मनरेगाच्या मुद्यांवरून कामगार संघटनांनी सरकारला आव्हान दिले.
केंद्रीय ट्रेड युनियन्सच्या संयुक्त प्लॅटफॉर्मने आपल्या मागण्यांसाठी गुरूवार दि.१२ फेब्रुवारी रोजी देशव्यापी संप केला. ट्रेड युनियन्सचे म्हणणे आहे की हा संप केंद्र सरकारच्या कामगार-विरोधी, शेतकरी-विरोधी आणि देश-विरोधी, कॉर्पोरेट समर्थक धोरणांच्या विरोधात आहे. या आंदोलनात बँकिंग, वीज, विमा, वाहतूक, आरोग्य आणि शिक्षण अशा विविध क्षेत्रांतील सुमारे ३० कोटी कामगार सहभागी झाले असून आझाद भारताच्या इतिहासातील हा सर्वात मोठा औद्योगिक संप असल्याचे मानले जात आहे.
बँकिंग आणि विमा क्षेत्रावर मोठा परिणाम
ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसच्या सरचिटणीस अमरजीत कौर यांनी दिलेल्या माहितीनुसार, या संपामुळे देशातील बँकिंग आणि विमा सेवांना मोठा फटका बसला आहे. एआयबीईए आणि एआयबीओए सारख्या मोठ्या युनियन या संपात सामील झाल्या आहेत. विमा क्षेत्रातील कर्मचारी १०० टक्के थेट परदेशी गुंतवणुकीला विरोध करत असून, नवीन कामगार कायद्यांच्या विरोधात आपला संताप व्यक्त करत आहेत.

पान १ वरून

## मोहगणी वृक्ष लागवडीमध्ये घोटाळा...

आल्या. कामामध्ये कसल्याच प्रकारची वेंडर प्रोसेस करण्यात आलेली नाही. थेट वैयक्तिक खात्यावर पैसे टाकण्यात आलेले आहेत. सर्व जणांना १ ते २ दिवसात पेमेंट टाकण्यात आले. संघटीतरित्या हा भ्रष्टाचार करण्यात आलेला आहे.

## या गावात झाली नियमबाह्य कामे

**फाईली तशाच पडून आहेत परंतु भ्रष्टाचाराची चैन ही गेवराई ते नागपूर जोरात चालत आहे, यातून शासनाचा निधी चक्क खाल्ला जात आहे.**

## १५ उसतोड मजुरांची सुटका...

एका व्यक्तीच्या मदतीने उत्तरप्रदेशातील ललितपुर जिल्ह्यातील कांही मजुरांना ऊसतोड मजुर म्हणुन आम्ला, हिंगणी येथे नोव्हेंबर महिन्यात आणले होते.तेव्हापासून युपीचे सर्व ऊसतोड मजूर ओम सोळंके यांच्याकडे मजुरीचे काम करत होते.या मजुरांना त्यांच्या कामाच्या बदल्यात कुठलाच आर्थिक मोबदला दिला जात नव्हता. याबाबत सदरील सर्वच मजुरांना प्रथम आपल्या ठेकेदारामार्फत व नंतर स्वतःच ओम सोळंके याच्याकडे कामाचा मोबदला मागितला. परंतु सोळंके यांने मजुरांना दमदाटी करून व सतत मारहाण करून व जिवे मारण्याची धमकी देत त्यांच्यावर दबाव टाकत, त्यांना डांबून ठेवत विना मोबदला काम करवून घेता होता.यामुळे सर्वच मजुर वैतागले होते.त्यातच याप्रकरणाची माहिती उत्तरप्रदेशातील ललितपुर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना दिली.त्यावर ललितपुरचे जिल्हाधिकारी यांनी यावर तातडीने कारवाई करत बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना विशेष पत्र पाठवून व फोन करून उत्तरप्रदेशातील ऊसतोड मजुरांची ओम सोळंके यांच्या तावडीतून मुक्तता करण्याची विनंती केली.त्यावर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी माजलगावचे उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांना आदेश दिले.त्यावर इंगोले,धारूरचे नायब तहसीलदार सुरेश पाळवदे व त्यांच्या सहकारी यांनी सर्व मजुरांची मुक्तता केली.

माजलगावात केलीसर्वांची मुक्कामाची व जेवनाची व्यवस्था

उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार सुरेश पाळवदे व इतरांनी डांबून ठेवलेल्या सर्व मजुरांची मुक्तता करून त्यांना घेऊन ते माजलगाव तहसील कार्यालयात गेले.तेथे सर्व मजुरांच्या जेवनाची व्यवस्था करून, त्यांच्या मुक्कामाची व्यवस्था केली.

सर्व मजुरांची रवानगी केली

मुक्त केलेल्या सर्व मजुरांना एक रात्र विश्रांती दिल्यानंतर गौरव इंगोले यांनी सर्व मजुरांना उत्तरप्रदेशातील त्यांच्या मुळ गावी एका विशेष वाहनातून रवाना केले.

दिंद्रुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

उत्तरप्रदेशातील मजुरांना डांबून ठेवत त्यांना सतत मारहाण करून व जिवे मारण्याची धमकी देत त्यांच्यावर दबाव टाकत त्यांच्याकडून काम विना मोबदला काम करवून घेतल्याबद्दल ओम चंद्रकांत सोळंके यांच्यावर दिंद्रुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असुन, सहायक पोलीस निरीक्षक महादेव ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस जमादार सिध्देश्वर डोईफोडे व त्यांचे सहकारी तपास करत आहेत. आरोपी अद्याप फरार असल्याचे समजते.

## गणेश नगरातील तीन गतीरोधके हटविली...

अतिक्रमण असो, इतर विकास कामे असो, अनधिकृत नळ कनेक्शन असो किंवा चुकीच्या पद्धतीने टाकलेली गतीरोधके काढण्याच्या घटना असो, नगर सेवकांनी स्वत:हून पुढे आले पाहिजे, मात्र तसे होत नसल्याचे दिसून येत आहे. बीड शहरातील १००,६०,३० आणि १० फुटाच्या रस्त्यावरही गतीरोधके टाकण्यात आलेली आहेत. काही दिवसापुर्वीच सारडा नगरीच्या समोर असलेले मोठे गतीरोधक तोडण्यात आली. या गतीरोधकावर अनेक अपघात झाले होते. सहयोग नगरच्या गणपती मंदिराजवळीलही
गतीरोधके काढण्यात आले. तसेच मागच्या १५ ते २० दिवसापुर्वी कृष्ण मंदिराच्या पुढे सेन्ट ॲन्स शाळेच्या अलिकडे रस्त्यावर दोन गतीरोधके टाकण्यात आली होती, ती ही काढण्यात आली. चुकीच्या पद्धतीने नको त्या रस्त्यावर अपघात होत आहेत. स्वराज्य नगरमध्ये मागच्या १ महिन्यापुर्वी गतीरोधकावरुन पडुनच एका पोलीसकर्मचाऱ्याचा मृत्यू झालेला आहे त्यामुळे कोणत्या भागात गतीरोधके करायची व कोणत्या भागात करायची नाहीत याचे गांभीर्य प्रशासनाला असते. नागरिकांनी नको ती काळजी करु नये अशा प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. बीड नगर पालिकेने अशी अनधिकृत तयार करण्यात आलेली गतीरोधके शोधण्याची मोहिम सुरु केली असून हे सर्व गतीरोधके काढण्यात येणार आहेत. गतीरोधकाची उंची किती असावी? हे ठरलेले आहे मात्र अनेक ठिकाणी चक्क ६-६ इंच उंच गतीरोधके केली जातात, ज्यामुळे एखाद्या मोटारसायकलवर पाठिमागे महिला, भगिणी बसलेली असेल तर गतीरोधकाच्या धक्क्याने व ती खाली पडू शकते. पाठीच्या मणक्यांना इजा होऊ शकते, असे प्रकार घडलेले आहेत. त्यामुळे नगर पालिका आणि पोलीस यंत्रणेने संयुक्तरित्या गतीरोधकाच्या विरुद्ध मोहीम आखली पाहिजे.


## जाहिर प्रगटण

आमचे पक्षकार **यमुना सुभाष शेंडे**, रा. तुळजाई चौक, कॅनॉल रोड, बीड ता. जि.बीड यांनी दिलेल्या माहिती व दाखवलेल्या कागदपत्रावरुन तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक **संजिवनी येडप्पा डोईफोडे**, रा.बँक कॉलनी, कॅनॉल रोड, बीड यांचेकडुन खरेदी करण्याचा करार केलेला असुन सदर मिळकतचे वर्णन खालील प्रमाणे

र.डी.जि.प.बीड सब डि.व पं.स.ता. बीड कसबे बीड तरफ गिराम येथील नगर परिषद हद्दीचे आतील गट नं. ११०/अ मधील प्लॉट क्र.१९ ज्याचे क्षेत्र लांबी : पुर्व-पश्चिम ४० फुट व रुंदी: दक्षिणोत्तर ४० फुट ज्याचे एकुण क्षेत्रफळ १६०० चौ. फुट म्हणजेच १४८.६९ चौ.मी. असुन ज्याची चतुः सिमा पुर्वेस- खोड यांचे घर, पश्चिमेस-शिंदे सर यांचा मॉल, दक्षिणेस-१५ फुट रुंदीचा रस्ता, उत्तरेस याच लेआऊट मधील रिकामा प्लॉट

वरील वर्णनाचा व चतुः सिमेच्या आतील मिळकत हि आमचे पक्षकाराने मिळकतीचे मालक **संजिवनी येडप्पा डोईफोडे** यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचा लेखी व्यवहार केलेला असुन तशी इसारपावती देखील करुन दिलेली आहे व लवकरच नोंदणीकृत खरेदीखत करुन घेणार आहेत.

वरील वर्णनाची मिळकत ही निर्विवाद तसेच बिनबोजा असल्याचे आश्वासन व विश्वास मिळकतीचे मालक **संजिवनी येडप्पा डोईफोडे** यांनी दिलेली आहे. या उपर मिळकतीमध्ये जर कोणाचे काही हितसंबंध जसे इसारपावती, खरेदीखत, गहाणखत, दान, बक्षीसपत्र, चोळीबांगडी, आममुखत्यारपत्र, कर्ज बोजा, न्यायालयीन /कार्यालयीन वाद इ.स्वरुपाचे असतील तर संबंधीताने हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत योग्य पुराव्यासह खालील पत्त्यावर आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत जर कोणाचा काही आक्षेप आला नाही तर सदर मिळकतीचे कायम खरेदीखत करुन घेण्यात येईल व त्यानंतर कोणाचा आक्षेप आला तर त्याचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहिर प्रगटन.

ठिकाण : बीड
दिनांक : १२/०२/२०२६

**– जाहिर प्रगटन देणार–**
**यमुना सुभाष शेंडे**
रा. तुळजाई चौक, कॅनॉल रोड, बीड
ता.जि.बीड
मो.नं.

**मार्फत–**
**ॲड. एन.सी. शिंदे**
**जिल्हा व सत्र न्यायालय, बीड**
**मो.नं.९५११७२४४१२**

16549-13450


## सुरेश व अर्चना कुटे रुग्णालयात...

त्यांना नेमका कोणता आजार झालेला आहे हे नेमकं कळू शकलेलं नाही. किती दिवस रुग्णालयात ठेवले जाणार आहे याची माहिती मिळाली आहे. कुटेंच्या ज्या मालमत्ता आहेत त्याची विक्री करुन ठेवीदारांना पैसे द्यायचे अशी चर्चा होती, त्याचेही काय झाले ते अद्याप कळालेले नाही.

## बीड सार्वजनिक शिवजयंती अध्यक्षपदी नितीन लांडे

दत्ता काशीद (पैलवान) यांची निवड करण्यात आली.
या कार्यकारिणीच्या निवडीसाठी बैठकीला मागील अध्यक्ष प्रा.सत्येंद्र पाटील, यांच्यासोबत माजी अध्यक्ष प्रा.विजय पवार अ.भा.छावाचे बीड जिल्हाध्यक्ष अशोक अण्णा रोमन, सामाजिक कार्यकर्ते विनोद अण्णा धांडे, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष बाळासाहेब गोरे, जय मल्हार बागल, तसेच माजी अध्यक्ष दत्ता साळुंके यांच्यासह अनेक शिवप्रेमी उपस्थित होते.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक गिरीश करवा यांनी केले व प्रा. विजय पवार तसेच मागील अध्यक्ष प्रा. सत्येंद्र पाटील यांनी यावर्षीची शिवजयंती साधेपणाने साजरी करण्यासाठी मार्गदर्शन केले
नूतन कार्यकारणीच्या निवडीनंतर अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन नियुक्तीचे प्रमाणपत्र दिले व निवडीबद्दल सर्वांनी शुभेच्छा दिल्या.

## नगर सेवकांनी जनतेला वेळ द्यावा...

येणाऱ्या अडचणी, ज्यांना लाभ मिळाला आणि ज्यांना लाभ मिळण्यात अडचणी आल्या, अशा विविध विषयांवर माजी आमदार लक्ष्मण पवार, बाळराजे पवार यांनी मार्गदर्शन केले. मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांनी मंजूर करण्यात आलेले घरकुल व प्रस्तावित असलेल्या घरकुल आवास योजनेंची माहिती देऊन, या योजनेंतर्गत पूर्ण व प्रगतीपथावर असलेल्या घरकुलाची माहिती दिली. माजी आमदार लक्ष्मण पवार यांनी सांगितले की, घरकुल आवास योजना महत्त्वपूर्ण टप्पा आहे. तीन चार महिन्यांत मूर्त रूप येईल, अशा पद्धतीने काम करा, आपण निधी उपलब्ध करून देऊ, तसेच पंधरा दिवसाला आढावा बैठक घ्या, दोन - तीन ग्रुप करण्याची सूचना ही त्यांनी केली. नगरसेवकांनी वेळ द्यावा, तरच तुमच्या पदाला अर्थ आहे. सुरूवात करा म्हणजे, तुम्हाला लाभधारक कागदपत्रासाठी मदत करतील, असे निरिक्षण ही माजी आमदार लक्ष्मण पवार यांनी नोंदविले आहे. आढावा बैठकीस सर्व नगरसेवक, सभापती शहदाद भाई, बद्दुशेठ, सभापती महेश सौंदरमल, सभापती प्रशांत राख, राजेश टाक,नगरसेविका सुमित्राताई थोरात, आप्पासाहेब कानगुडे,माजी उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी, माजी नगराध्यक्ष ब्रम्हदेव, माजी नगराध्यक्ष सुशिल जवंजाळ, धुरंधरे, उपसभापती सोनाली सुतार, भरत गायकवाड, किशोर धोंडलकर, शिनुभाऊ बेदरे, सय्यद एजाज मेंबर, बाबा पिसाळ, राम पवार, संजय इंगळे, मुन्ना सेट, सालम चाऊस,लक्ष्मण चव्हाण, इम्रान पठाण,येळापुरे सर, यांच्यासह सर्व नवनिर्वाचित नगरसेवक, माजी नगरसेवक, नपचे कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

## एन.ए.परवानगी इतिहासजमा...

आतापर्यंत शेतजमीन बिनशेती करण्यासाठी जमीनमालकाला प्रथम स्थानिक प्राधिकरणाकडून बांधकाम परवानगीसाठी प्रस्ताव सादर करावा लागत होता. त्यानंतर तो प्रस्ताव स्थानिक स्वराज्य संस्थेकडून जिल्हाधिकाऱ्यांकडे अंतिम मान्यतेसाठी पाठवला जात होता. या दुहेरी प्रक्रियेमुळे नागरिकांचा वेळ जात होता. अशी प्रकरणे प्रलंबित राहत असल्याने नागरिकांना जिल्हाधिकारी कार्यालयात वारंवार चकरा माराव्या लागत होत्या.
या पार्श्वभूमीवर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार शेतजमीन बिनशेती करण्यासाठी लागणारी स्वतंत्र परवानगीची सक्ती रद्द केली आहे. त्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहितेत बदल करून तसे राजपत्र प्रसिद्ध केले आहे.
अनेक बँका कर्ज देताना अकृषक सनदेचा आग्रह धरतात. मात्र, नियोजन प्राधिकरणाची परवानगी मिळाल्यावर बँकांनी सनदेसाठी आग्रह धरू नये. जिल्हाधिकाऱ्यांनी हे आदेश सर्व बँकांच्या निदर्शनास आणून द्यावेत, असेही निर्देश महसूल विभागाने दिले आहेत. दरम्यान, महाराष्ट्र जमीन महसूल संहितेत सुधारणा करण्याबाबत हिवाळी अधिवेशनात याबाबतची रूपरेषा ठरली होती. त्यानुसार हा निर्णय घेत सरकारने सर्वसामान्य जनतेला दिलासा दिला आहे. हे सरकार जनतेच्या कल्याणासाठी काम करते, याचे प्रत्यंतर देणारा हा निर्णय आहे, असे महसूलमंत्री बावनकुळे यांनी म्हटले आहे.
नव्या नियमांबरोबरच बांधकाम परवानगीसाठी 'बीपीएमएस' किंवा 'ऑटो डीसीआर'द्वारे ऑनलाईन अर्ज करता येणार असून बांधकाम परवानगी मिळताच महसूल विभागाच्या संगणकीय प्रणालीद्वारे ७/१२ उताऱ्यात आपोआप फेरफार नोंद घेतली जाणार आहे. केवळ बांधकाम परवानगी मिळाली म्हणून भोगवटादार वर्ग-२ च्या (कमी श्रमाच्या जमिनी) दर्जामध्ये बदल होणार नाही. त्यांच्यासाठी आवश्यक असलेले नजराणा शुल्क भरावेच लागणार आहे, असे महसूल विभागाने स्पष्ट केले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वतंत्र परवानगीची गरज नाही

नव्या नियमानुसार जर एखाद्या जमिनीचा वापर विकास आराखड्यानुसार अनुज्ञेय असेल तर नियोजन प्राधिकरणाने दिलेली बांधकाम परवानगी हीच अकृषक परवानगी मानली जाईल. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वतंत्र परवानगीची किंवा सनदेची गरज राहणार नाही.

नागरिकांची जुन्या थकबाकीतून मुक्तता

ज्या नागरिकांचा अकृषक कर थकीत आहे, त्यांना दिलासा देताना राज्य सरकारने या सुधारणेच्या दिनांकापर्यंतचा थकीत कर वसूल करण्यापासून सूट दिली आहे. मात्र, ज्या जमिनी २००१ पूर्वी किंवा त्यानंतर बिनशेती झाल्या आहेत, त्यांच्या मालकांना या शासन निर्णयापासून एक वर्षाच्या आत विहित दराने एकरकमी अधिमूल्य भरावे लागणार आहे.

एकवेळचा रुपांतरण दर

दरवर्षी भरावा लागणारा अकृषक कर रद्द करून त्याऐवजी जमिनीच्या बाजारमूल्यानुसार टप्पानिहाय एकरकमी रुपांतरण अधिमूल्य आकारले जाईल. त्यासाठी १ हजार चौ.मी.पर्यंतच्या क्षेत्रफळासाठी चालू बाजारमूल्याच्या ०.१० टक्के, तर १००१ ते ४००० चौ.मी.पर्यंतच्या क्षेत्रफळासाठी ०.२५ टक्के आणि ४ हजार चौ.मी.पेक्षा जास्त असलेल्या क्षेत्रफळासाठी चालू बाजारमूल्याच्या ०.५० टक्क्यानुसार दर आकारले जाणार आहेत.

# घाटसावळीत लोकाभिमुख बैठक; तहसीलदार शेळके यांचा शेतकऱ्यांशी मुक्त संवाद -बैठकीत प्रश्नांवर जागेवर तोडगे



बीड दि.१२ (प्रतिनिधी):- गोरक्षनाथ टेकडी (घाटसावळी) येथे आयोजित करण्यात आलेली महसूल मंडळस्तरीय आढावा बैठक केवळ औपचारिकता न राहता, थेट नागरिकांच्या प्रश्नांना हात घालणारी आणि शासन आपल्या दारी या संकल्पनेला मूर्त रूप देणारी लोकाभिमुख संवादसभा ठरली. बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत प्रशासन आणि नागरिक यांच्यातील अंतर लक्षणीयरीत्या कमी झाल्याचे चित्र दिसून आले.
राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभाग अधिक गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या नियमित आढावा बैठका, तपासणी दौरे आणि स्पष्ट सूचनांमुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेला नवी दिशा मिळाल्याचे या बैठकीत जाणवले.
जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, उपविभागीय अधिकारी कविता जाधव तसेच निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासन अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी विविध उपक्रम प्रभावीपणे राबवले जात असल्याचे अधोरेखित करण्यात आले. प्रशासन केवळ नियमांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा न राहता, समाजाच्या संवेदनशील प्रश्नांवर सक्रिय भूमिका घेणारी व्यवस्था बनावी, या दृष्टीने निर्णय घेतले जात असल्याचे स्पष्ट झाले.
बैठकीत अतिवृष्टीमुळे झालेल्या पिक नुकसानीबाबत अनुदान, ई-पीक नोंदणी, ई-पीक पाहणी, नुकसानभरपाईसाठी आवश्यक कागदपत्रे, आधार कार्ड अद्ययावत ठेवण्याची आवश्यकता तसेच थेट लाभ योजनांचा लाभ घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तहसीलदार शेळके यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी शांतपणे ऐकून घेत प्रत्यक्ष मार्गदर्शन केले.
विशेष म्हणजे, तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी दिवसभरात केंद्रीय समितीसोबत दौरा पूर्ण केल्यानंतरही शेतकऱ्यांच्या अडीअडचणी जाणून घेण्यासाठी ही बैठक घेतली. दिवस संपला तरी कर्तव्य संपत नाही, ही भावना त्यांच्या कार्यपद्धतीतून दिसून आली. सेवा हीच साधना या म्हणीप्रमाणे त्यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला.
सामाजिक विषयांवरही बैठकीत विशेष भर देण्यात आला. बालविवाह रोखण्यासाठी गावपातळीवर जनजागृती, शाळा-महाविद्यालयांत समुपदेशन, ग्रामपंचायत आणि पोलीस यंत्रणेच्या समन्वयातून प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याचे आवाहन करण्यात आले. जशी करणी तशी भरणी या म्हणीचा दाखला देत समाजातील कुप्रथा रोखण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे शेळके यांनी स्पष्टपणे सांगितले.
पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण, जलसंधारण, प्लास्टिकमुक्त अभियान आणि नैसर्गिक साधनसंपत्तीच्या जतनासाठी प्रशासनाकडून ठोस पावले उचलली जात असल्याचे त्यांनी नमूद केले. शिक्षण क्षेत्रात शाळाबाह्य मुलांना मुख्य प्रवाहात आणणे, विद्यार्थ्यांची गळती थांबवणे, शिक्षक-पालक समन्वय वाढवणे आणि शैक्षणिक सुविधा बळकट करणे या उपाययोजनांवरही चर्चा झाली. ग्रामीण विकासाच्या दृष्टीने पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य सुविधा आणि शासकीय योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा निर्धार प्रशासनाने व्यक्त केला. बैठकीत उपस्थित असलेल्या एका शेतकऱ्याने समाधान व्यक्त करत सांगितले, आमचे प्रश्न गावातच ऐकले जात आहेत, हीच आमच्यासाठी मोठी दिलासा देणारी बाब आहे. आता तालुक्याच्या फेऱ्या माराव्या लागत नाहीत. तर ग्रामपंचायत प्रतिनिधींनी सांगितले, अशा बैठकीमुळे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील अंतर कमी होते, विश्वास वाढतो आणि कामकाजात पारदर्शकता येते.
बैठकीस मंडळ अधिकारी सतिश बांगर, ग्राम महसूल अधिकारी महेश आखाडे, नितीन पोपळे, ग्रामपंचायत अधिकारी सोनवणे, पोखरीचे सरपंच गोरख दन्ने, मैंदा सरपंच राजेंद्र राठोड, उपसरपंच मुन्ना घुमरे, ग्रामस्थ दिलीप लांडे, ओम तात्या खवतड, शाळेचे मुख्याध्यापक तसेच घाटसावळी गावातील अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी कृषी सहाय्यकांनी विविध कृषी योजनांचे तसेच ई-पीक व कृषी प्सचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकही दाखवले.
ग्रामस्थांनी मांडलेल्या अडचणी शेळके यांनी संयमाने ऐकून घेतल्या. अनेक प्रश्नांवर जागच्या जागी मार्गदर्शन देत काही विषयांवर तात्काळ तोडगे सुचविण्यात आले. त्यामुळे नागरिकांना तालुका किंवा जिल्हा मुख्यालयात वारंवार फेऱ्या मारण्याची गरज भासली नाही. थेंबे थेंबे तळे साचे या म्हणीप्रमाणे छोटचा-छोटचा उपाययोजनांतून मोठे बदल घडू शकतात, हा विश्वास नागरिकांत निर्माण झाला.
एकूणच, घाटसावळी येथील ही महसूल मंडळस्तरीय आढावा बैठक राज्य शासनाच्या धोरणात्मक दिशेचा, विभागीय व जिल्हास्तरीय मार्गदर्शनाचा आणि तालुकास्तरावरील संवेदनशील अंमलबजावणीचा सुंदर संगम ठरली. प्रशासनाची तत्परता, निर्णयक्षमता आणि नागरिकांचा वाढता विश्वास यामुळे ही बैठक लोकाभिमुख प्रशासनाचा आदर्श नमुना ठरल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# एनसीएमसी कार्ड असेल तरच मिळणार एसटी बस प्रवासात सवलत

मुंबई दि.१२ (प्रतिनिधी):- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) प्रवाशांना पारदर्शक आणि सोयीस्कर सेवा देण्यासाठी नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड म्हणजेच एनसीएमसी लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. परिवहन मंत्री आणि राज्य परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, विविध सामाजिक सवलतींचा लाभ घेण्यासाठी आता हे स्मार्ट कार्ड आवश्यक असेल.

एनसीएमसी कार्ड अनिवार्य:

हा केवळ तांत्रिक बदल नाही तर प्रवाशांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी उचलेलं एक पाऊल आहे. हे कार्ड सवलती, कॅशलेस पेमेंट आणि पारदर्शक प्रणालीचे अचूक रेकॉर्ड सुनिश्चित करेल. या प्रकल्पासाठी एसटीने एबिक्स टेक्नॉलॉजीज लिमिटेड आणि एनएसडीएल पेमेंट्स बँकेसोबत भागीदारी केली आहे.सर्व डेपोमध्ये लवकरच नोंदणी मोहीम सुरू होईल. प्रताप सरनाईक यांच्या घोषणेनंतर, आता प्रत्येकाकडे हे कार्ड असणे आवश्यक असेल.

कोणाला मिळणार एनसीएमसी कार्ड ?

मिळालेल्या माहितीनुसार, या नवीन योजनेत विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दिव्यांग प्रवाशांचा समावेश आहे. अपंग प्रवासी, स्वातंत्र्यसैनिक, मान्यताप्राप्त पत्रकार आणि राज्यस्तरीय पुरस्कार विजेत्यांना एनसीएमसी कार्ड दिले जातील. विद्यार्थ्यांचे कार्ड त्यांच्या शाळेच्या क्रमांकाशी, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांचे कार्ड त्यांच्या आधार क्रमांकाशी आणि अपंग प्रवाशांचे कार्ड त्यांच्या UDID क्रमांकाशी जोडले जातील. या कार्डची किंमत १९९ आहे (GST gh), परंतु जुने स्मार्ट कार्ड सादर केल्यावर ते १४९ मध्ये उपलब्ध असेल.

प्रवास सोपा आणि सुरक्षित होण्याकडे भर

कार्डमध्ये किमान १०० रुपये शिल्लक असणे आवश्यक आहे. यामध्ये तुम्ही ५० रुपयांच्या पटीत रिचार्ज करू शकता. हा रिचार्ज तुम्हाला ईटीआयएम मशीन, वेबसाइट, मोबाईल ॲप किंवा अधिकृत एजंटद्वारे करता येईल. ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या सोयीसाठी ३,००० हून अधिक एजंट नियुक्त करण्यात आले आहेत. तर ग्रामीण भागातील प्रवाशांनाही बसस्थानकावर नोंदणी करण्याच्या सुविधेचा फायदा होईल. राज्य परिवहन प्राधिकरणाच्या (एसटी) या उपक्रमामुळे प्रवास सोपा आणि सुरक्षित होईल.

# विमान जाणूनबुजून पाडले ? खळबळजनक दाव्याची सरकारकडून दखल

नवी दिल्ली दि.१२ (वृत्तसेवा):- राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी अजित पवार यांच्या विमान अपघातात झालेल्या निधनावर साशंकता व्यक्त करत हा घातपात असल्याचा दावा केला आहे. त्यावरून महाराष्ट्रात आता उलटसुलट प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. दुसरीकडे आज मागील वर्षी अहमदाबाद येथे झालेल्या विमान अपघाताबाबत करण्यात आलेल्या घातपाताच्या दाव्यावरून खळबळ उडाली आहे. मागील वर्षी जुलै अहमदाबादमध्ये झालेल्या एअर इंडियाच्या विमान अपघातप्रकरणी थेट पायलटवर संशय व्यक्त करण्यात आला आहे. Corrieie Della Sera या इटालियन दैनिकाने याबाबतचे वृत्त दिले आहे. पायलटने जाणूनबुजून फ्युएल स्वीच बंद केल्याचा दावा या वृत्तामध्ये करण्यात आला आहे. या विमान अपघातात २६० जणांचा मृत्यू झाला होता. तर केवळ एकाच प्रवाशाचा जीव वाचला होता

पान ६ वरून

## ऊसतोड मजुराच्या अल्पवयीन मुलीवर दोन वेळा

होताच आरोपीने ट्रॅक्टर हादगाव (डोका) शिवारात सोडून तो फरार झाला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिन्द्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शना खाली पिंक पथकाचे प्रमुख पोलिस उप निरीक्षक प्रकाश शेळके हे पुढील तपास करीत आहेत.

## माजलगावात आता कहर झाला

रुपयांचा माल लंपास केला. चोरी झाल्याचे लक्षात येताच महिलेने आरडाओरड केली, मात्र तोपर्यंत आरोपी पसार झाले होते. याप्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार विजय गायकवाड पुढील तपास करत आहेत.

## उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या उपस्थितीत आ.धस यांची सह्याद्रीत

यावेळी आमदार सुरेश धस यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांची भेट घेऊन बीड जिल्ह्यासह आपल्या मतदारसंघातील विविध विकासकामांबाबत सविस्तर चर्चा केली. प्रलंबित प्रकल्पांना तातडीने निधी मंजूर करणे, नवीन विकासकामांना प्रशासकीय मान्यता देणे आणि स्थानिक पातळीवरील मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे याबाबत त्यांनी ठोस मागण्या मांडल्या. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासन सकारात्मक असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.स्व. अजितदादा पवार यांनी बीड जिल्ह्याच्या प्रगतीसाठी केलेल्या कार्याची आठवण यावेळी व्यक्त करण्यात आली. त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेत सुनेत्राताई पवार यांच्या नेतृत्वाखाली विकासाला नवसंजीवनी मिळेल, असा आशावाद बैठकीत व्यक्त करण्यात आला. बैठकीस जिल्ह्यातील मान्यवर लोकप्रतिनिधी, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी व संबंधित विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते. समन्वयातून आणि नियोजनबद्ध पद्धतीने जिल्ह्याच्या प्रगतीस गती देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.


हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी



## बीएसएनएलच्या माजी महाव्यवस्थापकांसह ७ जण दोषी कोट्यवधींचा गैरव्यवहार

### सीबीआय न्यायालयाकडून शिक्षा



छत्रपती संभाजीनगर दि १२(प्रतिनिधी)- भारत संचार निगम लिमिटेड अर्थात बीएसएनएलच्या २००० सालामध्ये चर्चेत आलेला दूरध्वनी बिल छपाई कंत्राटातील कोट्य वधींच्या गैरव्यवहारात सार्वजनिक सेवकांनी पदाचा गैरवापर करत खासगी कंपनीला लाभ करून दिल्याप्रकरणी सीबीआय न्यायालयाचे विशेष न्यायाधीश संजय के. कुलकर्णी यांनी माजी महाव्यवस्थापकासह ७ आरोपींना दोषी ठरवत कारावास व दंडाची शिक्षा सोमवारी सुनावली.माजी महाव्यवस्थापक दर्शनकुमार सीताराम खन्ना, संचालक (वित्त) गणपत पंढरीनाथ भोकारे, दानिश शफाकत भगत, रोहन सुरेश वैद्य, कार्तिक आर. के. शाहनी, रोहित मस्तराम गुप्ता अशी शिक्षा झालेल्याची नावे आहेत. बीएसएनएलच्या औरंगाबाद कार्यालयात दूरध्वनी बिल छपाईसाठी कंत्राट देताना गंभीर अनियमितता झाल्याचे सीबीआय तपासात निष्पन्न झाले. तत्कालीन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी झेरॉक्स मॉडिकॉर्प लिमिटेडच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करून निविदा प्रक्रियेत हस्तक्षेप केला. या गैरव्यवहारातून संबंधित खासगी कंपनीला आर्थिक फायदा झाला, तर बीएसएनएलचे मोठे नुकसान झाले. बीएसएनएलच्या महा व्यवस्थापकासह तपासा दरम्यान माजी संबंधित अधिकाऱ्यांनी कंत्राट देण्यासाठी बेकायदेशीर मोबदला स्विकारल्याचे पुरावे समोर आले. महाव्यवस्थापक दर्शनकुमार खन्ना, संचालक (वित्त) गणपत भोकारे तसेच इतर अधिकाऱ्यांनी पदाचा गैरवापर करून लाच स्विकारल्याचे सीबीआयतर्फे विशेष सरकारी वकील अरविंद कुमार यांनी न्यायालयात सिद्ध केले. सुनावणी अंती न्यायालयाने हा प्रकार केवळ नियमभंग नसून, जाणीवपूर्वक केलेली फसवणूक असल्याचा ठपका ठेवत आरोपींना दोषी ठरवले. यामुळे बीएसएनएल क्षेत्रामध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे.

#### माजी महाव्यवस्थापकांना सक्तमजुरी

न्यायालयाने भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा तसेच भारतीय दंड संहितेअंतर्गत आरोपींना दोषी ठरवताना माजी महाव्यवस्थापक दर्शनकुमार खन्ना व संचालक भोकारे यांना विविध कलमांखाली २ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली.यात दर्शन कुमार खन्ना यांना २ लाखांचा तर भोकारे यांना १ लाखाचा दंड ठोठावण्यात आला. उर्वरीत आरोपींना कट रचल्याप्रकरणी ६ महिने सक्तमजुरी व प्रत्येकी २५ हजारांचा दंड ठोठावण्यात आला. तर फसवणूक केल्याप्रकरणी दानिश भगत, रोहन वैद्य, कार्तिक शाहनी, रोहित गुप्ता यांना १ वर्ष सक्तमजुरी व प्रत्येकी ५० हजार रुपयांचा दंड सुनावण्यात आला आहे.

#### म्हातारपणी शिक्षा झाल्यावर वाईट हाल होतात

वीस वर्षानंतर का होईना पण अधिकाऱ्यांना शिक्षा झाली. यामुळे भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्याला लगाम लागेल. भ्रष्ट अधिकारी कर्मचाऱ्यांना वाटतं की आता आमचं काही बिघडत नाही आम्ही रिटायर झालो आहोत. पण म्हातारपणी ही शिक्षा झाल्यानंतर फार वाईट हाल होत असतात हे इतर कर्मचाऱ्यांनी लक्षात ठेवावं .तर अशा शिक्षा प्रत्येक प्रकरणात बसू लागल्या तर भ्रष्ट सरकारी अधिकारी कर्मचाऱ्यांना भ्रष्टाचार करताना दहा वेळेस विचार करावा लागेल. नव्हे तर पुढे काय होईल हे त्यांना अशा शिक्षेच्या माध्यमातून दिसले गेले पाहिजे.

## अक्षय मुंदडा यांच्या हस्ते नदी खोलीकरणाचा शुभारंभ

चिंचोली माळी दि १२(प्रतिनिधी)- केज तालुक्यातील नाव्होली परिसरातील शेतकऱ्यांसाठी नदी सरळीकरण व खोलीकरण कामाचा शुभारंभ अक्षय भैय्या मुंदडा यांच्या हस्ते करण्यात आला.

नाव्होली ते दैठणा या दरम्यान सुमारे ३ किलोमीटर लांबीच्या नदीपात्राचे सरळीकरण व खोलीकरण करण्यात येणार आहे. या कामामुळे पाण्याचा साठा वाढण्यास मोठी मदत होणार असून भविष्यात शेती व पिण्याच्या पाण्यासाठी उपलब्धतेत लक्षणीय वाढ होईल. तसेच ,या उपक्रमामुळे भूजलपातळी सुधारण्यास हातभार लागेल तसेच परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांना दीर्घकालीन दिलासा मिळणार आहे.यावेळी गावचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दलित समाजाचे जीवनमान उंचावण्यासाठी समाजकल्याणचा निधी खर्च करा-बाळासाहेब मोरे

बीड दि १२(प्रतिनिधी)- समाजकल्याण विभागामार्फत शासनाकडून वारंवार निधी उपलब्ध करून दिला जातो त्या निधीतून दलितवस्तीमधे विविध विकास कामे केली जातात मात्र गेली पाच ते सहा वर्षांपासून इतर सर्व लोकउपयोगी कामांना बगल देऊन फक्त सौरदिवे बसवण्यावर भर देण्यात आला असुन हे पथदिवे सर्वत्र बंद अवस्थेत दिसून येतात त्यामुळे समाजकल्याण विभागाचे कोट्यावधी रुपये व्यर्थ गेल्याने मागासवर्गीय समाजात प्रशासनाबद्दल रोष निर्माण झाला आहे हा हक्काचा निधी ठराविक लोकांच्या घशात घालण्यापेक्षा दलित समाजाचे जीवनमान उंचविण्यासाठी मार्गी लावावा अशी सामान्य जनतेमधून मागणी होत आहे नालीदार लोखंडी पत्रे,शिलाई मशीन, पिठाची गिरणी,जुने रमाई घरकुल दुरुस्ती, शेळीपालन व कुक्कुटपालन यासारख्या बाबीवर खर्च करून निधीचा अपव्यय टाळावा नसता आगामी काळात सर्वसामान्य जनतेला सोबत घेऊन मोठे जनांदोलन उभारण्यात येईल असा इशारा शिवशक्ती-भीमशक्ती विचार मंचाचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांनी बीड जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना लेखी निवेदनाद्वारे दिला आहे

## जेष्ठ पत्रकार अविनाश मुडेगावकर यांना सुवर्णरत्न पत्रकारिता पुरस्कार

अंबाजोगाई दि १२ (प्रतिनिधी)- संकल्प विद्या प्रतिष्ठान कडून दिला जाणार २०२५- २०२६ साठीचा ''सुवर्णरत्न पत्रकारिता '' पुरस्कार अंबाजोगाई येथील जेष्ठ पत्रकार अविनाश मूडेगावकर यांना जाहीर झाला. त्यासाठी त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

## खरीप २०२५ पिक विमा तात्काळ जमा करून शेतकऱ्यांच्या खात्यावर हेक्टरी १७ हजार रु. द्या

बीड दि १२(प्रतिनिधी)- खरीप हंगाम २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील



शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी प्रत्येक पात्र शेतकऱ्याला हेक्टरी १७ हजार रुपये पिक विमा देण्याची घोषणा केली होती.मात्र फेब्रुवारी महिना सुरू होऊनही अद्याप बहुतांश शेतकऱ्यांच्या खात्यावर खरीप २०२५ चा विमा जमा झालेला नाही. काही शेतकऱ्यांना मिळालेली रक्कमही अत्यंत तुटपुंजी असून शासनाच्या घोषणेनुसार संपूर्ण मदत मिळालेली नाही, तेव्हा खरीप २० २५ चा पिक विमा तात्काळ जमा करून शेतकऱ्यांच्या खात्यावर हेक्टरी १७ हजार रुपये टाकावेत अशी मागणी तुषार पाटील यांनी शासनाकडे केली आहे.या संदर्भात नमूद केले की अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्यांची पिके तर गेली पण अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या हाती काही लागलं नाही यामुळे शेतकरी आधीच आर्थिक संकटात सापडलेला असताना शासनाने केलेली घोषणा तात्काळ अमलात आणावी व प्रत्येक पात्र शेतकऱ्याच्या खात्यावर हेक्टरी १७ हजार रुपये तत्काळ जमा करावेत.या संदर्भात लवकरच महाराष्ट्राचे कृषिमंत्री जिल्हाधिकारी तसेच जिल्हा कृषी अधिकारी यांना निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती प्रसिध्दी पत्रकातून तूषार पाटील यांनी दिली आहे.

## जीएसटी अधिकारी सचिन जाधवर प्रकरणात आरोपी फाटे अद्यापही पोलिसांच्या हाती लागेना

बीड दि १२(प्रतिनिधी) - जीएसटी विभागातील अधिकारी सचिन जाधवर यांचा मृतदेह मांजरसुबा रोडवरील कपिलधार कमानीजवळ कारमध्ये आढळून आल्याने निर्माण झालेली खळबळ अद्याप शमत नाही. खिशात सापडलेल्या सुसाईड नोटमुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी कुटुंबीयांनी केली होती. मात्र पंधरा दिवस उलटूनही मुख्य आरोपी म्हणून नाव समोर आलेले प्रदीप फाटे अद्याप पोलिसांच्या हाती लागत नसल्याने तपासाच्या कार्यक्षमतेवर तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.गुन्हा नोंद व्हावा यासाठी जाधवर कुटुंबीयांना थेट पोलीस ठाण्याबाहेर धरणे आंदोलन करावे लागले. आंदोलनानंतर गुन्हा दाखल झाला, पण त्यानंतरची कारवाई मात्र अत्यंत संथ गतीने होत असल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे, जाधवर यांच्या मृत्यूच्या दिवशीच प्रदीप फाटेला चौकशीसाठी बोलावून नंतर सोडण्यात आले होते. त्यानंतर तो फरार झाला. त्यामुळे पोलिसांनीच आरोपीला पळ काढण्याची संधी दिली का, अशी शंका व्यक्त होत आहे. दरम्यान सचिन जाधवर यांच्या पत्नीने आणखी एक धक्कादायक दावा केला आहे. जाधवर यांनी आत्महत्या केली त्याच्या आठ दिवसांपूर्वी त्यांच्या मुलाला शाळेतून दोन अज्ञात इसमांनी नेण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक माहिती सांगितले. या घटनेमुळे कुटुंबीयांची भीती आणि संताप दोन्ही वाढले आहेत.आरोपीला तात्काळ अटक करून निष्पक्ष आणि पारदर्शक तपास करावा, अशी मागणी जाधवर कुटुंबीयांसह विविध सामाजिक संघटनांकडून होत आहे. अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अपघातग्रस्त व्यक्तींना ७५ हजारांची रुपयांची आर्थिक मदत

किट्टी आडगाव दि १२ (प्रतिनिधी)- स्व. बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष आणि डॉक्टर श्रीकांत शिंदे फाउंडेशन तर्फे माजलगाव तालुका वैद्यकीय समन्वयक वैशाली ताई आगे त्यांच्या पुढाकाराने तालुक्यातील अपघात झालेल्या टालेवाडी येथील दीपक भारत गुरसाळी याला इलाज साठी मुख्यमंत्री सहायता निधीतून ७५ हजार रुपयाची आर्थिक मदत झाली.

अपघातामध्ये सदर व्यक्तीचे उजव्या मांडीचे हाड फ्रॅक्चर झाले होते त्यानिमित्ताने त्यांना आळणे हॉस्पिटलबीड मध्ये उपचारासाठी दाखल केले होते तिथे त्यांना उपचारासाठी दोन लाख ४५ हजार रुपये खर्च झाला असताना पैसे भरण्यासाठी प्रतिकूल परिस्थितीत लोककल्याणाचे व समाजाचे दायीत्व जोपासणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या वतीने उपमुख्यमंत्री सहाय्यता निधीतून वैद्यकीय उपचारासाठी माजलगाव तालुक्याच्या वैद्यकीय समन्वयक वैशाली ताई आगे यांच्या पुढाकाराने ७५ हजाराची मदत करण्यात आली या आर्थिक सहाय्यामुळे वैद्यकीय उपचार करणे शक्य झाले स्व.बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष आणि डॉ.श्रीकांत शिंदे फाउंडेशन तर्फे हीआर्थिक मदत करण्यात आली.म्हणून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ,खा.डॉ.श्रीकांत शिंदे ,शिवसेना नेता तथा विधान परिषद उपसभापती डॉ.निलमताई गोर्हे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख मंगेश चिवटे , राज्य समन्वयक रामहरी राऊत सर, बीड जिल्हा समन्वयक ॲड .उज्वलाताई भोपळे, माजलगाव ता. समन्वयक वैशालीताई आगे यांचे त्यांचे बंधू रामराज भारत गुरसाळे यांनी आभार व्यक्त केले.

## मातृभाषा हीच आपली संस्कृती असल्याने मुलांना मराठी भाषेतूनच शिक्षण द्या -डॉ. सुधाकर शेंडगे



गेवराई दि १२(प्रतिनिधी) पालकांनी आपल्या मुलांना मातृभाषेतून अर्थात मराठी भाषेतूनच शिक्षण द्यावे, कारण भाषा हीच आपली संस्कृती आहे. संस्कार भाषेतूनच होत असतात. त्यामुळे इंग्रजीचा अट्टाहास न धरता किमान प्राथमिक शिक्षण मातृभाषेतूनच द्या,असे आवाहन डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे संचालक डॉ सुधाकर शेंडगे यांनी केले. गेवराई येथील जि. प. प्राथमिक शाळ कोल्हेर या शाळेच्या स्नेहसंमेलनात उद्घाटन प्रसंगी बोलत होते. याप्रसंगी कै. संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी कार्यक्रमाला भेट देऊन शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गेवराई तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष विष्णू प्रसाद खेत्रे, तर प्रमुख मार्गदर्शक शिक्षण विस्तार अधिकारी शेमे सर हे होते. विद्यार्थ्यांनी याप्रसंगी देशभक्तीपर गीत, नृत्य, नाट्य प्रयोग व लोक गीत, कोळी गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. गावच्या सरपंच सपना राधेश्याम चक्कर, विष्णू आडे सर ,अर्जुन जाधव सर , केंद्रप्रमुख सुळे सर, माजी संचालक बापुसाहेब तारुकर, बनसोडे सर, कांबळे सर, प्रधान सर , ग्राम विकास अधिकारी अटोळे , हभप दुर्गादास जोशी, माजी सरपंच किसन भुसे, माजी अध्यक्ष प्रकाश यादव, माजी अध्यक्ष गौतम गायकवाड, तसेच शिक्षक पतसंस्था गेवराई चे माजी चेअरमन डॉ. श्री तात्यासाहेब मेघारे सर यांनी गावकऱ्यांचे सहकार्या बद्दल कोल्हेर चे कौतुक केले , रेवकी केंद्र व इतर शाळेतील शिक्षकवृंद, गावातील महिला, पुरुष मंडळी अतिशय मोठ्या संखेने उपस्थित होते. यावेळी कोल्हेर गावातील सर्व प्रतिष्ठित नागरिकाचे आणि ग्रामपंचायत चे सहकार्य लाभले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कुलकर्णी सर, श्रीमती चौधरी मॅडम, श्रीमती अंधारे मॅडम, जगताप सर, गैणलवार सर, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुनिल चंद्रसेन जाधव, उपाध्यक्ष अप्पासाहेब पवार, ज्ञानेश्वर कातकडे, गणेश काशिद, विनोद गायकवाड, सुनिल काळे, संतोष भुसे, संतोष चक्कर, रमेश सुतार, नितीन मेटे, तसेच स्फुर्ती कला व क्रीडा मंडळ यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री कुलकर्णी सर यांनी केले तर, मुख्याध्यापक श्रीमती. निसर्गंध मॅडम यांनी सर्वांचे आभार मानले.

## कामगार विरोधी चार श्रम संहिता रद्द करा-शिवाजी कुरे

माजलगाव दि १२ (प्रतिनिधी)- सिटू संघटनेच्या वतीने गुरुवार दिनांक १२ फेब्रुवारी रोजी करण्यात आलेल्या देशव्यापी संपामध्ये देशातील वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या संघटना सहभागी झालेल्या असतानाच माजलगाव तहसीलवर सिटू संघटनेच्या वतीने संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी कुरे यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढण्यात आला.

केंद्र सरकारने प्रचलित २९ कामगार कायद्याचे रूपांतर चार श्रमसंहिता कायद्यात केलेली आहे. त्यानुसार दिलेल्या निवेदनात संघटनेने म्हटले आहे की, कामगार विरोधी ४ श्रम संहिता रद्द करा, सर्व योजना कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देऊन वेतन प्रदान करा, मनरेगा कायदा पूर्ववतपणे चालू ठेवा, आशांनी ऑफलाइन काढलेल्या आयुष्यमान कार्डाचे तात्काळ पैसे देण्यात यावे, आशांना दरमहावेतन चिट्ठी देण्यात यावी, ग्रामरोजगार सेवकांचे थकीत मानधन तात्काळ वाटप करा, शालेय पोषण कामगारांना दहा महिन्याच्या ऐवजी संपूर्ण बारा महिन्याचे मानधन देण्यात यावे, निराधार वृद्धांचे पेन्शन दरमहा वेळेवर वाटप




करण्यात यावे अशा मागण्या करण्यात आल्या या मोर्चात दत्ता डाके,शिवाजी कुरे, सय्यद रज्जाक,रामचंद्र चिंचाणे, रत्नाकर गोळेकर,उषा औसे, उर्मिला शेंडगे, अर्चना पांचाळ, बंडूराम गरड, मुसद्दीक बाबा, अशोक पोकळे, विनायक पौळ,मोहन जाधव, सुहास झोडगे, आसाराम राठोड, उपस्थित होते.

## बोकडे कुटुंबाने सत्काराला फाटा देत शाळेसाठी दिली पाच हजारांची देणगी



अंभोरा दि १२ (प्रतिनिधी)- अंभोरा येथे नुकत्याच पार पडलेल्या शुभविवाह प्रसंगी एक समाजोपयोगी आणि प्रेरणादायी उदाहरण समोर आले. येथील नवनाथ बोकडे व त्रिंबक बोकडे यांनी आपल्या मुलीच्या लग्नामध्ये होणाऱ्या सत्कार खर्चाला फाटा देत ५ रुपये जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रगतीसाठी देणगी म्हणून शाळेकडे सुपूर्द केले.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, नुकत्याच पार पडलेल्या या विवाह सोहळ्यात मच्छिंद्र काका खाकाळ यांनी ''सत्कारासाठी खर्च करण्यापेक्षा ती रक्कम शाळेसाठी दिली तर ती विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी उपयोगी पडेल,'' अशी संकल्पना मांडली. या विचाराला सकारात्मक प्रतिसाद देत मुलीचे वडील नवनाथ बोकडे यांनी तत्काळ शाळेसाठी देणगी देण्याचा निर्णय घेतला. ही रक्कम शाळेच्या स्वाधीन करण्यात आली.

या स्तुत्य उपक्रमाबद्दल शाळेच्या वतीने -बोकडे कुटुंबाचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. गावातील नागरिकांनीही या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत ''वैयक्तिक आनंदाच्या क्षणीही समाजासाठी हातभार लावण्याची ही कृती इतरांसाठी प्रेरणादायी आहे,'' अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.हा उपक्रम ग्रामीण भागातील शिक्षणवृद्धीसाठी मोलाचा ठरेल, असा विश्वास शाळा व्यवस्थापन व ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

## महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात द्या विजय साळवे यांच्या नेतृत्वाखाली भीम अनुयायांची जंतर-मंतरवर धडक

माजलगाव दि १२ (प्रतिनिधी) - बुद्धगया येथील महाबोधी महाविहार बौद्ध समाजाच्या ताब्यात द्यावा, या प्रमुख मागणीसाठी १२ फेब्रुवारी रोजी दिल्लीतील जंतर-मंतरवर होणाऱ्या बुद्धगया मुक्ती आंदोलनात सहभागी होण्यासाठी माजलगाव तालुक्यातून मोठ्या संख्येने भीम अनुयायी रवाना झाले.आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते, रिपब्लिकन सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष तथा महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन कृती समितीचे अध्यक्ष विजय साळवे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांचा ताफा दिल्ली येथे दाखल झाला. देशभरातून या आंदोलनाला मोठा प्रतिसाद मिळत असून, माजलगाव तालुक्यातील अनुयायांमध्येही उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.बौद्ध समाजाच्या हक्कांसाठी लढा अधिक तीव्र करण्याचा निर्धार यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.या प्रसंगी विलास गायसमुद्रे, विश्वनाथ तोडके, ओमप्रकाश टाकणखार, वशिष्ट लांडगे, राकेश साळवे, विलास खळगे, अमित खर्डे, विशाल ससाने, लहू ससाने, प्रकाश तोडके, संतोष खुणे, सचिन पडमुख, प्रकाश शेळके, भास्कर पौळ, अंजेराम घनगाव आदी उपस्थित होते.

## घरकुल लाभधारकाचे प्रलंबित हप्ते तात्काळ द्यावेत लाभार्थ्यांना वेठीस धरणाऱ्या अभियंता व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करा - जीवन आबा हांगे

केज दि १२(प्रतिनिधी)- प्रधानमंत्री आवास योजना,रमाई आवास, आदी घरकुल योजनांतील लाभार्थ्यांचे प्रलंबित हप्ते तात्काळ द्यावेत तसेच संबंधित अभियंता व ऑपरेटर यांच्यावर चौकशी करून कारवाई करावी,अशी लेखी मागणी करण्यात आली आहे.सामाजिक कार्यकर्ते स्थानिक पदाधिकारी जीवन आबा हांगे यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती केज यांनादिलेल्या निवेदनातून ही बाब पुढे आली.निवेदनात नमूद केल्या प्रमाणे,केज तालुक्यातील काही गावांतील घरकुल लाभार्थ्यांना पहिला हप्ता मिळाल्यानंतर पुढील हप्ते मंजूर होत नसल्याच्या तक्रारी आहेत.अनेक लाभार्थी आर्थिकदृष्ट्या दुर्बल असून बांधकाम अर्धवट अवस्थेत अडकले आहे.यामुळे कुटुंबांना राहण्यासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे पत्रात म्हटले आहे.या सोबतच, काही ठिकाणी हप्ते मिळण्यासाठी अवैध पैशांची मागणी होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित अभियंता व संगणक ऑपरेटर यांच्या कडून लाभार्थ्यांकडे पैसे मागितले जात असल्याची तक्रार लोकांकडून होत असल्याचे पत्रात नमूद आहे.गरीब लाभार्थ्यांची अडवणूक थांबवून, त्यांना त्वरित न्याय द्यावा अशी मागणी करण्यात आली आहे.जीवन आबा हांगे यांनी प्रशासनाला इशारा देत,जर तातडीने कारवाई झाली नाही तर आंदोलनाचा मार्ग अवलंबण्याचा इशाराही दिला आहे.त्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच सर्व पात्रलाभार्थ्यांचे प्रलंबित हप्ते तातडीने वितरित करावेत,अशी मागणी केली आहे.या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी बीड,मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड,उप मुख्य कार्यकारीअधिकारी (ग्रामीण विकास) तसेच संबंधित ग्रामीण गृहनिर्माण विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.दरम्यान, या आरोपांबाबत संबंधित अधिकाऱ्यांची प्रतिक्रिया मिळू शकलेली नाही. प्रशासनाकडून चौकशी होऊन वस्तुस्थिती स्पष्ट होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## तणावाच्या काळात अनेकांचे हात-पाय पडतात थंड -डॉ.जगदीश टेकाळे

पाटोदा दि १२ (प्रतिनिधी)- कामाचा दबाव,कौटुंबिक जबाबदाऱ्या किंवा भविष्याबद्दलच्या चिंता यांचा केवळ मनावरच नाही तर शरीरावरही परिणाम होतो. तणावाच्या काळात अनेकांचे हायपाय अचानक थंड पडतात. त्यामागे काही वैज्ञानिक कारणे आहेत.



रक्तप्रवाह कमी- तणावाच्या वेळी शरीर स्वतःला धोक्यात असल्याचे समजते. डॉक्टर स्पष्ट करतात की तणावाच्या वेळी, शरीर मेंदू आणि हृदयासारख्या महत्वाच्या अवयवांना प्राधान्य देते. त्यामुळे हातपायांमध्ये रक्तप्रवाह कमी होऊन त्यांना थंडी जाणवते.रक्तवाहिन्यांचे आकुचन - तणावामुळे अॅड्रनालाइन आणि कॉर्टिसोलसारखे ताण संप्रेरक बाहेर पडतात. त्यामुळे रक्तवाहिन्या आकुंचन पावतात. डॉक्टरांच्या मते, जेंव्हा रक्तवाहिन्या आंकुचन पावतात तेंव्हा हातपायांपर्यंत कमी गरम रक्त पोहोचते. त्यामुळे अचानक थंडी वाजू लागते.चिंतेमुळे होते घबराट - अतिचिंतेमुळे घाबरल्यासारखे होऊ शकते. या काळात श्वासोच्छ्वास जलद होतो. शरीरातील ऑक्सिजन संतुलन बिघडू शकते. पॅनिक अटॅकदरम्यान, हात आणि पाय थंड, सुन्न किंवा थरथर कापू शकतात. ही मज्जासंस्थेची प्रतिक्रिया आहे, असे डॉक्टर सांगतात.

१) रक्तदाब,साखरेच्या पातळीत बदल - काही लोकांचा रक्तदाब अचानक कमी होऊ शकतो किंवा तणावाच्या वेळी त्यांच्या रक्तातील साखरेची पातळी असंतुलित होऊ शकते. डॉक्टर म्हणतात की, कमी रक्तदाब किंवा कमी साखरेसारख्या परिस्थितीत, हातपायांपर्यंत पुरेशी ऊर्जा पोहोचत नाही, ज्यामुळे हातपाय थंड होऊ शकतात. २) थायरॉइड किंवा मज्जासंस्थेच्या समस्या

- जर हातपाय थंड नसतांनाही वारंवार थंड राहिले तर ते अंतर्निहित समस्येचे लक्षण असू शकते. डॉक्टर म्हणतात की, ताणामुळे थायरॉइड किंवा मज्जासंस्थेच्या समस्यांमध्ये लक्षणे आणखी बिकट होई शकतात. ३) डॉक्टरांशी कधी संपर्क साधावा ? - जर ताणतणावासोबत सतत हातपाय जास्त थंड होणे, सुन्न होणे किंवा मुंग्या येणे, चक्कर येणे,चिंता किंवा श्वास घेण्यास त्रास होत असेल तर तुम्ही डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. या लक्षणांकडे दुर्लक्ष करु नका आणि स्वतःकडे लक्ष द्या असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले.

# संपादकीय

## कॉपीची कुप्रथा

आपल्याकडे फेब्रुवारी – मार्च हा परीक्षांचा काळ असतो. या महिन्यात परीक्षा पार पाडण्याची जणू परंपराच आहे. दहावी – बारावी या बोर्डाच्या परीक्षा याच काळात असतात. इतकेच काय तर शिष्यवृत्ती, नवोदय, मंथन यासारख्या स्पर्धा परीक्षा देखील याच काळात होतात. यावर्षी बारावीची बोर्ड परीक्षा १० फेब्रुवारी पासून सुरू झाली असून ती ११ मार्चला संपणार आहे तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च दरम्यान होणार आहे. या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मैलाचा दगड असतात. विद्यार्थ्यांच्या जीवनाला कलाटणी देणाऱ्या या परीक्षा असतात. दरवर्षी लाखो विद्यार्थी या परीक्षेला बसतात. यावर्षीही लाखो विद्यार्थी दहावी – बारावीची परीक्षा देणार आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी वर्षभर मन लावून अभ्यास केलाय ते विद्यार्थी या परीक्षांना बेधडकपणे सामोरे जातात मात्र ज्या विद्यार्थ्यांचा पुरेसा अभ्यास झाला नाही ते विद्यार्थी गैरमार्गाने ही परीक्षा उत्तीर्ण होण्याचा प्रयत्न करतात. त्यातीलच एक गैरमार्ग म्हणजे कॉपी. दहावी बारावीच्या परीक्षेत दरवर्षी हजारो विद्यार्थी कॉपी करताना आढळतात. काहींवर कारवाई होते तर काहींना समज देऊन सोडून दिले जाते मात्र कॉपीची ही किड मुळापासून उखडून टाकली जात नाही. कॉपी ही आपल्या शिक्षण व्यवस्थेला लागेलेली किड आहे. वर्षभर अभ्यास न करता परीक्षेच्या दिवशी कॉपी करून उत्तीर्ण होण्याकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. ही धोक्याची घंटा आहे म्हणूनच खुद्द पंतप्रधानांना देखील यात लक्ष घालावे लागले होते. मागील वर्षी मन की बात या आपल्या कार्यक्रमात पंतप्रधानांनी याच विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांना पंतप्रधानांनी कॉपी केल्याने आयुष्य घडवता येत नाही असा कानमंत्र दिला होता. कॉपी करून आपण एखादी परीक्षा उत्तीर्ण होऊ शकतो मात्र जीवनाच्या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी कॉपी नव्हे तर अपार मेहनतच करावी लागते. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर मेहनतीला पर्याय नाही असा संदेशही पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांना दिला होता मात्र विद्यार्थ्यांनी पंतप्रधानांचा हा संदेश अंमलात आणला नाही असेच म्हणावे लागेल कारण सध्या चालू असलेल्या बारावीच्या परीक्षेत राज्यातील अनेक भागात मास कॉपी झाल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचायला मिळाली. बीड, जालना यासारख्या शहरात कॉपीमुक्त परीक्षा या शिक्षण विभागाच्या अभियानाला हरताळ फासला गेला. अनेक परीक्षा केंद्रावर विद्यार्थी कॉपी करताना आढळले. काही परीक्षा केंद्रावर मास कॉपी होत असल्याचा व्हिडिओ देखील व्हायरल झाला. याप्रकरणी काही पर्यवेक्षक आणि केंद्र संचालकांवर शिक्षण विभागाने कारवाई देखील केली आहे. दहावी – बारावी परीक्षेत कॉपी होऊ नये यासाठी शिक्षण विभाग विविध पावले उचलत असताना विद्यार्थ्यांकडून त्यास पुरेसा प्रतिसाद मिळत नाही असेच म्हणावे लागेल. दरवर्षी कॉपी करणाऱ्या मुलांची संख्या वाढतच चालली आहे. कॉपीची कुप्रथा कमी होण्याऐवजी वाढतच चालली आहे. वर्षभर अभ्यास न करणारे विद्यार्थी कॉपीच्या या कुप्रथेचे आवर्जून पालन करतात. काही ठिकाणी तर काही शाळा आणि संस्था देखील निकाल चांगला लागावा म्हणून या कुप्रथेला प्रोत्साहन देतात. काही पालकही आपल्या पाल्यांना कॉपी पुरवण्यासाठी जीवाचे रान करतात. शाळेच्या, परीक्षा हॉलच्या बाहेर कॉपी पुरवण्यासाठी तोबा गर्दी उसळते. झेरॉक्स दुकानांवर देखील तेवढीच गर्दी असते. अर्थात परीक्षेत कॉपी होऊ नये म्हणून प्रशासन सर्वोतोपरी प्रयत्न करते हे मान्यच करावे लागेल. राज्यात कॉपीमुक्त परीक्षा व्हावी यासाठी प्रशासनाकडून विविध प्रकारचे अभियान राबवले जाते. भरारी पथक हे त्यापैकीच एक अभियान. बोर्डाच्या परीक्षा सुरू असताना काही अधिकारी बोर्डाकडून नेमले जातात. हे अधिकारी परीक्षा केंद्रावर अचानक भेटी देऊन परीक्षा केंद्रावर धाक बसवतात. कॉपी करताना कोणी विद्यार्थी आढळला तर त्याच्यावर कारवाई केली जाते. त्यांचे थेट निलंबन केले जाते. पण कॉपी बहाद्दरांना तुरुंगात टाकण्याची तरतूद आपल्याकडील कायद्यात नाही मात्र देशातील काही राज्यात कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांना थेट तुरुंगात पाठवण्याचा कायदा आहे. आपल्याकडे देखील आता कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांना वचक बसावा आणि राज्यात कॉपीमुक्त परीक्षा व्हाव्यात यासाठी राज्यसरकार प्रयत्न करत आहे. त्यासाठी त्यांनी अनेक कठोर निर्णय घेतले आहेत. कॉपीमुक्त अभियानासाठी राज्यसरकार जे प्रयत्न करीत आहे ते स्वागतार्ह असले तरी कठोर कायदे करूनच कॉपिला आळा घालता येईल असे नाही तर कॉपी करू नये यासाठी विद्यार्थ्यांचे प्रबोधनही करायला हवे. कॉपी करणारा विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण होऊ शकतो मात्र जीवनाच्या परीक्षेत तो उत्तीर्ण होऊ शकत नाही. जीवनाच्या प्रत्येक पावलावर परीक्षा असतात . त्यात उत्तीर्ण होण्यासाठी कॉपी नव्हे तर कठोर मेहनतच घ्यावी लागते. कठोर मेहनतीशिवाय फळ मिळत नाही. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर कॉपिसारख्या कुप्रथेला मूठमाती द्यावीच लागेल.

# बदामराव पंडित यांच्या प्रयत्नाला यश अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाला मान्यता

गेवराई दि १२(प्रतिनिधी):- गेवराई तालुक्यातील शेतकरी, कष्टकरी आणि सामान्य नागरिक पक्षकारांना सुलभ सत्वर, तत्पर, अत्यल्प त्रासात व अत्यल्प खर्चात न्याय मिळावा यासाठी गेवराई येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाची नव्याने स्थापना करून कोर्टाची इमारत दुमजली करण्याची मागणी भाजपाने ते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. या मागणीला यश आले असून गेवराई जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीशांच्या न्यायालयाची स्थापना करण्याची मान्यता मिळाली आहे. आता लवकरच कोर्टाची इमारत दुमजली होणार आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी ८ ऑक्टोबर २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन, बीड येथील जिल्हा व सत्र न्यायालय प्रलंबित असलेली गेवराई तालुक्यातील दिवाणी स्वरूपाची सर्व प्रकारची व फौजदारी स्वरूपाची सर्व प्रकारची मिळून अंदाजे ५०० पेक्षा जास्त प्रकरणे न्यायप्रविष्ठ असल्याचे म्हटले होते. गेवराई तालुक्यातील बहुतांश गावे बीड न्यायालयात असून अंदाजे १२० ते १३० किलोमीटर अंतरावर वसलेली आहेत. त्यामुळे पक्षकारांना बीड येथे जाण्या येण्यासाठी अत्यंत त्रासदायक, गैरसोयीचे, खर्चिक व असुविधायुक्त होत आहे. त्यामुळे न्याय मिळवताना पक्षकाराचे अत्यंत गैरसोय होत आहे. न्यायालयीन कामासाठीही त्यांना वेळेवर पोहोचता येत नाही. त्यामुळे त्यांच्यावर अन्याय होऊन पक्षकारांना शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागतो व वेळप्रसंगी अधिकचा दंड सहन करावा लागतो असे सांगून, गेवराई तालुक्यातील पक्षकारांना सुलभ, सत्वर, तत्पर, अत्यल्प त्रासात व अत्यल्प खर्चात न्याय देण्यासाठी गेवराई येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करावे अशी मागणी केली होती. याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ दखल घेतली. दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ रोजी कक्षा अधिकारी महाराष्ट्र शासन सुनील आखरे यांनी प्रबंधक निरीक्षणे-२, मा उच्च न्यायालय मुंबई यांना माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पत्राचा संदर्भ देऊन गेवराई येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करणे बाबत मागणी कळवली होती. या अनुषंगाने दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी आनंद एल. यावलकर, प्रधान जिल्हा न्यायाधीश बीड यांनी गेवराई येथे जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीशांच्या न्यायालयाची स्थापना करणे बाबत माननीय उच्च न्यायालयाचे पत्र क्रमांक इ (थ)--१२०२, दिनांक ३० जानेवारी २०२६, २०१४/२९३/६०३६ द्वारे गेवराई जिल्हा बीड येथे नवीन जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायाधीशांचे न्यायालय स्थापन करण्याचा प्रस्ताव तत्वतः स्वीकारला आहे. ११६८ प्रकरणांची पुरेशी प्रलंबितता लक्षात घेता न्यायालयीन इमारत आणि न्यायालयीन अधिकाऱ्यांच्या निवासस्थानासाठी आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांसाठी निवासी निवासस्थान बांधण्याच्या आधीन असल्याचे म्हटले आहे. माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या प्रयत्नामुळे यापूर्वीच गेवराई येथे कोर्टाची फर्निचर सह भव्य इमारत उभा राहिलेली आहे. आता या नव्या आदेशामुळे हीच कोर्ट इमारत लवकरच दुमजली होणार आहे. यामुळे गेवराईतील सर्व वकील बांधवांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांचे आभार मानले आहेत.

## गेवराई कोर्टाची इमारत होणार दुमजली



# माध्यमिक विद्यालय मारफळा येथे १० वी विद्यार्थ्यांना निरोप



टाकरवण दि १२( प्रतिनिधी)- माध्यामिक विदयालय मारफळा येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थांना निरोप समारंभाचा कार्यक्रम आयोजित करून निरोप देण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक पवार व्हि .पी . सर होते प्रमुख पाहुणे शाळेचे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गुलाब भाऊ कुटे , शरद भाऊ कबले, शिवाजी महाराज कुटे,,रवी शिर्के, दिपक गिरी पठाण आमजद, रडे महाराज, विठ्ठल चव्हाण,गोरख राठोड,या मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेचे पूजन करण्यात आले. दीपक गिरी यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना परिक्षेनिमित्त मोफत पेनाचे वाटप केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक गायकवाड डी .बी . सर यांनी केले.तर सूत्रसंचालन इ . ९ वीची विद्यार्थिनी कु चव्हाण अक्षरा हिने केले.यावेळी दहावीच्या वर्गातील चि .कुटे वेदांत, नववीच्या चि.राठोड शुभम व कु . पवार अनुष्का,या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच प्रमुख पाहुणे शरदभाऊ कबले यांनी आपले मनोगत व्यक्त करताना प्रथम, द्वितीय, तृतीय येणाऱ्या मुलांना प्रोत्साहानपर बक्षीस देण्याची घोषणा केली, शिवाजी महाराज कुटे यांनी भाषणात तुम्हाला मोठे व्हायचे असेल तर तर मोबाईलचा वापर कमी करून अभ्यासाला पुरेपूर वेळ देऊन अभ्यास केला पाहिजे असे सांगितले. अध्यक्षीय भाषणात शाळेचे मुख्याध्यापक पवार सर यांनी विद्यार्थ्यांनी व्यसनापासून दूर राहावे असे मोलाचे मार्गदर्शन केले . शेवटी माने सर यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानले .

## अट्टल महाविद्यालयात गणित विषयाची विभागीय स्पर्धा संपन्न

# मराठवाडा मॅथेमॅटिकल सोसायटी आणि र.भ.अट्टल महाविद्यालयाच्या स्पर्धेला प्रतिसाद

गेवराई, दि. १२(प्रतिनिधी)- मराठवाडा मॅथेमॅटिकल सोसायटी, छत्रपती संभाजीनगर आणि र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई यांच्या संयुक्त विद्यमानाने '२२ व्या रिजनल लेव्हल सेमिनार ऑन मॅथेमॅटिक्स न्ड इट्स एप्लिकेशन्स' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. बीड आणि धाराशिव या दोन जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठीची स्पर्धा यावर्षी र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे उद्घाटन प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण येथील प्रा. भाऊसाहेब सोनटक्के यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, अंबड येथील प्रा. रविराज कटारे आणि प्रा. भाऊसाहेब सोनटक्के यांनी जवाबदारी पार पाडली.



मराठवाडा मॅथेमॅटिकल सोसायटी, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून स्पर्धेसाठी पारितोषिके देण्यात आली. यामध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकवणाऱ्या विद्यार्थ्यास ७०० रुपये, द्वितीय क्रमांकास ४०० रुपये, तृतीय क्रमांकास ३०० रुपये आणि उत्तेजनार्थ पारितोषिक २०० रुपये देण्यात आले. या स्पर्धेत के.एस.के. महाविद्यालय, बीड येथील पूजा घोलप या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक पटकावला. तर द्वितीय क्रमांक र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई येथील विद्यार्थिनी प्राची आरडे, तृतीय क्रमांक बलभीम महाविद्यालय, बीड येथील गायत्री भिंगे आणि उत्तेजनार्थ पारितोषिक र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई येथील सय्यद आयेशा या विद्यार्थ्यांनी पटकावले. पारितोषिक वितरण व समारोपाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. रजनी शिखरे या होत्या. यावेळी प्रा. भाऊसाहेब सोनटक्के यांनी मार्गदर्शन केले. प्रा. रविराज कटारे यांनी स्पर्धेतील विद्यार्थ्यांच्या सहभागाबद्दल मत मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्पर्धेचे आयोजक उपप्राचार्य आणि गणित विभाग प्रमुख प्रा. विजय सांगळे यांनी केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांनी स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा. विनोद यादव यांनी केले, तर प्रा. आदित्य लगड यांनी आभार मानले. यावेळी उपप्राचार्य डॉ. प्रशांत पांगरीकर, प्रा. रणजीत पागोरे, प्रा. प्रदीप गायकवाड, प्रा. सुनील भगत, प्रा. अरुण भराडे, प्रा. प्रदीप दहिंडे, प्रा. दीपक डोंगरे, प्रा. नितीन क्षीरसागर यांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

# पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळा माजलगाव येथे स्वयंशासन दिन उत्साहात साजरा

माजलगाव दि १२ (प्रतिनिधी)- येथील पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळा माजलगाव येथे इयत्ता दहावी वर्गाचा स्वयंशासन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात ४०विद्यार्थिनींनी सहभाग घेऊन शाळेतील अध्यापनासहित सर्व प्रशासन चालविण्याचा अनुभव घेतला.

सकाळच्या सत्रात साक्षी कुलकर्णी, रुची दळवी,अंजली कुंभार, अंजली शेळके यांनी नाविन्यपूर्ण शैक्षणिक परिपाठ सादर करून सर्वांची प्रशंसा मिळवली.यानंतर १ली ते ९वी वर्गाना विविध विषयाचे ज्ञान देताना येणाऱ्या अडचणी व समस्या यांचा अनुभव घेतला. शाळेतील इतर विद्यार्थीना नवनवीन गोष्टी व खेळ शिकायला मिळाले. या स्वयंशासन दिनात मुख्याध्यापिका म्हणून दुर्गा कोळसे, उप मुख्याध्यापिका अंजली कुंभार तर जानवी जावळे हिने पर्यवेक्षक म्हणून काम पाहिले. क्लर्क ची भूमिका ज्योती ढगे तर परिचर म्हणून बेग उजमा व राणी गायकवाड यांनी उत्कृष्ट काम पाहिले. इतर विद्यार्थिनींनी अध्यापनाचे काम पाहिले. समारोप सत्रात प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले शाळेचे



मुख्याध्यापक मिलिंद गरबडे ज्येष्ठ शिक्षिका मंदा सारूक यांनी विद्यार्थिनींनी अनुभवलेल्या विविध भूमिकांचे कौतुक केले. नियोजन प्रमुख शरद नायबळ यांनी स्वयंशासन दिनाचा निकाल घोषित केला व विजेत्या विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.जानवी जावळे, साधना खोपे यांनी सूत्रसंचालन केले. मुख्याध्यापिका दुर्गा कोळसे हिने अध्यक्षीय समारोप केला तर अंजली कुंभार हिने पाहुण्यांचे आभार मानले. या कार्यक्रमाला शाळेतील सहशिक्षिका संगीता राठोड, जयश्री लोणीकर,संगीता शिंदे, शितल राठोड त्याचप्रमाणे सहशिक्षक सुंदर काळे, बालासाहेब कांबळे, नारायण भालशंकर, सौदागर सर,हनुमान शेरकर व संतोष साळवे यांनी मोलाचे सहकार्य केले.

# रेणुका बागलाने यांची कृषी उपसंचालकपदी निवड

नवगण राजुरी दि.१२(प्रतिनिधी)-: महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात



आलेल्या परीक्षेतून 'कृषी उपसंचालक' (वर्ग-१) पदी रेणुका बागलाने यांची निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.रेणुका बागलाने यांनी त्यांचे कृषी पदवीचे शिक्षण सौ.के.एस.के. (काकू) कृषी महाविद्यालयातून पूर्ण केले होते. सुरुवातीपासूनच अभ्यासात हुशार आणि जिद्दी असलेल्या रेणुका यांनी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून कृषी क्षेत्रात उच्च पद मिळवण्याचे ध्येय ठेवले होते. त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि मार्गदर्शनावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे.त्यांच्या या यशाबद्दल बोलताना अनंत कृषी विकास प्रतिष्ठानचे सहसचिव डॉ. गोविंद साळुंके, महाविद्यालयाचे प्राचार्य व शिक्षक वृंद म्हणाले की, रेणुकाचे यश हे केवळ तिचे वैयक्तिक यश नसून, महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांसाठी एक मोठी प्रेरणा आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जिद्द आणि चिकाटी ठेवली, तर ते प्रशासकीय सेवेत उच्च पदे भूषवू शकतात, हे तिने सिद्ध केले आहे.या त्यांच्या यशाबद्दल संस्थेचे सचिव तथा माजी मंत्री जयदत्त (अण्णा) क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, सहसचिव डॉ.जी.व्ही. साळुंखे, प्राचार्य डॉ.एस.पी. मोरे, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी रेणुका बागलाने यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# कामगार कर्मचारी यांचे केंद्र व राज्य सरकार विरोधात जिल्हा कचेरीसमोर तीव्र निदर्शने

बीड दि १२ (प्रतिनिधी)- अखिल भारतीय राज्य सरकारी कर्मचारी, जिल्हा परिषद कर्मचारी संघटना,शिक्षक, शिक्षकेतर कामगार संघटना,सर्व संघटनाच्या वतीने देशव्यापी पुकारलेल्या संपात कलेक्टर कचेरी समोर केंद्र व राज्य सरकारच्या विरोधात तीव्र निदर्शने करण्यात आली.

केंद्र सरकारच्या खाजगीकरण,कंत्राटीकरण, वाढलेली महागाई, शेतकऱ्यां च्या मालाला भाव नाही,शेतकरी कामगार कर्मचारी यांच्या विरोधात केंद्र सरकारने ४ कामगार कायदे रद्द करावेत ,जुनी पेन्शन योजना लागू करणे, चतुर्थ श्रेणी कर्मचारी वाहन चालक भरती वरील बंदी त्वरित उठवणे, १० वर्ष सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना कायम करणे,कॅशलेस उपचार पद्धती लागू करणे,३५३ अजामीनपात्र करा,सर्व विभागातील रिक्त पदे तात्काळ भरा,शिक्षकांचे जीवन उध्वस्त करणारा १५ मार्च २०२४ चा संच मान्यतेचा आदेशाचा पुनर्विचार करावा.नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण रद्द करावे, शेतीमालाला हमीभाव द्यावा,यावेळी आय टेक अध्यक्ष कॉ.नामदेव दादा चव्हाण, समिती अध्यक्ष बाबा बडे,जिल्हा परिषद महासंघाचे बळीराम उबाळे,निमंत्रक राजकुमार कदम,ग्रामरोजगार सेवक अध्यक्ष कॉ. भाऊसाहेब प्रभाळे,डी. जी.तांदळे यांच्यासह सर्व संघटनेचे अध्यक्ष सचिवांचे केंद्र व राज्य सरकारच्या




धोरणाविरुद्ध मनोगत व्यक्त केले.मान्यवरांनी केंद्र व राज्य सरकारच्या धोरणाला सर्व कामगार कर्मचाऱ्यांनी कडाडून विरोध केला व केंद्र सरकारच्या धोरणाचा सर्व संघटनांनी जाहीर निषेध व्यक्त केला.यापुढेही केंद्र सरकारच्या विरोधात मोठे जन आंदोलन उभा करावे लागेल असा इशारा महासंघाचे अध्यक्ष बळीराम उबाळे यांनी दिला आहे.यावेळेस सचिव नंदकिशोर परळकर, ग्रा.प.अध्यक्ष मधुकर शेळके,सचिव अविनाश राठोड,विभागीय सचिव सखाराम काशिद,उपाध्यक्ष अशोक चव्हाण,सहसचिव प्रदीप बनकर,जिल्हा उपाध्यक्ष आशाताई धुतमल,कोषाध्यक्ष उमेश हूलजुते,संघटक विलास बहिरवाळ, ता.सचिव रामेश्वर घाडगे,कार्याध्यक्ष उत्तरेश्वर आंधळे, स्थापत्या अभियांत्रिकीचे संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ओंकार उबाळे,प्रवक्ते चक्रधर हेंद्रे,इत्यादी बहुसंख्य कामगार कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी मा.देशाचे पंतप्रधान,महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांना निवेदने देण्यात आले असे महासंघाच्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# एनएसएल शुगर कारखान्यामुळे होणाऱ्या कथित प्रदूषणाची चौकशी सुरू

## सचिन शेजुळ यांच्या स्मरणपत्राची प्रशासनाने घेतली दखल

माजलगांव दि १२(प्रतिनिधी) - माजलगांव तालुक्यातील पवारवाडी येथील एनएसएल शुगर कारखान्यामुळे परिसरात होत असलेल्या कथित प्रदूषणाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या जालना येथील उपप्रादेशिक अधिकारी यांच्या मार्फत चौकशी सुरू करण्यात आली आहे.



सामाजिक कार्यकर्ते सचिन शेजुळ यांनी दिलेल्या स्मरणपत्राची प्रशासनाने दखल घेत ही कारवाई करण्यात आली.कारखान्यातून सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यामुळे परिसरातील शेती, पिण्याचे पाणी तसेच नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याच्या तक्रारी स्थानिक नागरिकांकडून वारंवार करण्यात येत होत्या. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते सचिन शेजुळ यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सविस्तर स्मरणपत्र सादर करून तात्काळ तपासणी करण्याची मागणी केली होती.या मागणीची दखल घेत उपप्रादेशिक अधिकारी (जालना) यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पथकाने कारखाना परिसराला भेट दिली. यावेळी पथकाने कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्याचे तसेच परिसरातील विविध ठिकाणांवरील पाण्याचे नमुने तपासणीसाठी घेतले. यासोबतच प्रदूषण तपासणी वॅनही कारखाना परिसरात दाखल करण्यात आली असून प्राथमिक तपासणीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.नमुने प्रयोगशाळेत तपासल्यानंतर प्राप्त होणाऱ्या अहवालाच्या आधारे पुढील आवश्यक ती प्रशासकीय कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली. दरम्यान, कारखान्यामुळे होत असलेल्या प्रदूषणाची सखोल चौकशी करून दोषी आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तसेच स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# जिओ नेटवर्क सेवा खंडित

## लिंबागणेश येथे टॉवरवर चढून केले लक्ष्यवेधी आंदोलन

लिंबागणेश दि १२(प्रतिनिधी)- बीड तालुक्यातील बालाघाट परिसरातील लिंबागणेश व पंचक्रोशी भागात रिलायन्स जिओ मोबाईल नेटवर्क सेवा गेल्या महिनाभरापासून वारंवार खंडित होत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते डॉग गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली टावर वर चढून गुरुवार दिनांक १२ फेब्रुवारी रोजी आंदोलन करण्यात आले.

या संदर्भात नमूद केले की नेटवर्क रेंज पूर्ण दिसत असतानाही इंटरनेट बंद पडणे, कॉल न लागणे व कॉल ड्रॉप होणे यासारख्या गंभीर तांत्रिक समस्यांमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.या समस्येचा सर्वाधिक फटका विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन शिक्षणाला, बँक व डिजिटल व्यवहारांना, व्यापारी उलाढालींना तसेच आरोग्य व शासकीय सेवांना बसत आहे. इंटरनेट सेवा ठप्प झाल्याने ऑनलाईन पेमेंट, पैसे ट्रान्सफर व सरकारी पोर्टलवरील कामे ठप्प झाल्याचे नागरिकांनी सांगितले.या पार्श्वभूमीवर जिओ कंपनीने तातडीने नेटवर्क सेवा सुरळीत करावी, कायमस्वरूपी



उपाययोजना राबवाव्यात व तांत्रिक अडचणी दूर कराव्यात, या प्रमुख मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते तसेच डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी सकाळी लिंबागणेश येथील जिओ टॉवरवर चढून लक्षवेधी आंदोलन करण्यात आले. दरम्यानमहसूल व पोलीस प्रशासनाच्या मध्यस्थीने आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले. निवेदन लिंबागणेश पोलिस चौकीचे सहाय्यक फौजदार राठोड, मंडळ अधिकारी पंडित नाईकवाडे व तलाठी पोतदार यांच्या मार्फत जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक व नेकनूर पोलिस स्टेशन यांना देण्यात आले.या आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, शिवशक्ती-भीमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील, ग्रामपंचायत सदस्य दामोदर थोरात, सुरेश निर्मळ, मधुकर थोरात, सर्पमित्र अशोक जाधव, औदुंबर नाईकवाडे, विक्रांत वाणी, सोनाजी शिंदे, सोनाजी कुदळे, संजय पावले,केशव गिरे आदी उपस्थित होते.दरम्यान, जिओ कंपनीच्या ढिसाळ सेवेविरोधात ग्रामस्थांनी बहिष्काराचा निर्धार व्यक्त केला असून अनेक युवकांनी आपली जिओ सिमकार्डे इतर कंपन्यांकडे पोर्ट करण्यास सुरुवात केली आहे. तातडीने सेवा सुधारली नाही, तर आणखी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

# चिंचवण येथील पाझर तलावाला दिलासा जनविकास फाउंडेशनचा दिलासा

बीड दि.१२ (प्रतिनिधी)- वडवणी तालुक्यातील चिंचवण येथे सोन्नाखोटा फाटा येथील पाझर तलाव पन्नास वर्षापासून कार्यान्वित करण्यात आला होता हा पाझर तलाव शेतकऱ्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा असून शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात पाणी मिळावे जनावरांचा पाण्याचा प्रश्न सुटावा त्याचबरोबर शेती पिकाच्या उत्पन्नामध्ये वाढ व्हावी या उद्देशाने या ठिकाणी पाझर तलाव करण्यात आला होता.

परंतु त्या काळामध्ये मशनरी नसल्यामुळे मनुष्याच्या आधारावर या तलावाचे काम करण्यात आले होते परंतु त्यावेळेला व्यवस्थितपणे भिंतीची दबाई, त्याचबरोबर खोलीकरण व भिंत व्यवस्थित भरणा करण्यात आला नव्हता त्यामुळे जास्त प्रमाणात तलाव पाझरून मोठ्या प्रमाणात त्यातील साठवा झालेले पाणी वायाला जात होते परंतु, तलाव मात्र नादुरुस्त असल्यामुळे शेती पिकांना जनावरांना पाणी कालावधीच्या अगोदरच पाझरून जात होते त्यामुळे जनतेच्या कार्यरत असलेल्या दिलासा जनविकास फाउंडेशनच्या वतीने या कामाचा शुभारंभ करण्यात आला दिलासा फाउंडेशन ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या जलसंधारणाच्या विशेषता कामावर लक्ष देऊन पाण्याचा प्रकल्प वाढावा यासाठी प्रयत्न करत आहेत त्याच उद्देशाने चिंचवण सोन्नाखोटा, फाटा येथील पाझर तलावाचे दुरुस्ती करण खोलीकरण त्याचबरोबर साईट भरणा काम चालू केले असून यामुळे शेतकऱ्यांना दिलासा फाउंडेशनच्या वतीने नक्कीच पाण्याच्या माध्यमातून दिलासा मिळाला आहे या शुभारंभ प्रसंगी दिलासा फाउंडेशनचे विलास राठोड, मल्हार ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता वाकसे, महेश मात्रे, चिंचवणचे उपसरपंच मयूर बडे, रामहरी बडे, लक्ष्मण तुरे, बब्बर शेख, लक्ष्मण बडे, शिवाजी तुरे, यासह अधिव उपस्थित होते.

# ऑर्बिट केबल्सच्यावतीने निवेदक सुरेश साळुंकेचा सत्कार

बीड दि.१२ (प्रतिनिधी):- इलेक्ट्रिकल क्षेत्रातील जगप्रसिद्ध ऑर्बिट केबल्सच्या प्रोडक्टच्या वतीने सुप्रसिद्ध निवेदक सुरेश साळुंकें चा सत्कार करण्यात आला.दी पावर ऑफ पिपल हे घोषवाक्य असलेल्या ऑर्बिट केबल्स कंपनीचे वायर आणि इतर इलेक्ट्रिकल्सचे प्रोडक्ट महाराष्ट्रभर लॉंचीग करण्याचे काम काम चालु आहे . इतर इलेक्ट्रिकल्स उत्पादना पेक्षा ऑर्बिट केबल्सची प्रोडक्ट दर्जेदार आणि आर्थिकदृष्ट्या कशी परवाडणारी आहेत याचे मार्गदर्शन ऑर्बिट केबल्स कंपनीचे एरिया जनरल मॅनेजर वैजीनाथ कुलकर्णी करतात तर निवेदक सुरेश साळुंके निवेदनसह मुख्य कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी सातत्याने साईटवर काम करणाऱ्या उपस्थित इलेक्ट्रिशियन युवकांसोबत निवेदक सुरेश साळुंके गप्पा गोष्टी गाणी करत गाणे म्हणायला लावत ,नाचवत आहे, हसवत आहेत. त्यामुळे कार्यक्रम अतिशय रंगारंग होत आहे.ऑर्बिट कंपनीचे जिल्हा हेड सेल्स मॅनेजर शेख आवेज आणि इतर जिल्हा हेड सेल्स मॅनेजर हे सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत.ऑर्बिट समारंभाचे यशस्वी निवेदन करत असल्या बद्दल प्रकाश



इलेक्ट्रिक्सचे संचालक प्रविण सगळेंच्या शूभहस्ते निवेदक सुरेश साळुंकेंचा सत्कर करण्यात आला.निवेदक सुरेश साळुंकेच्या हजरजबाबी आणि प्रचंड विनोदी स्वभावामुळे महाराष्ट्राभरातील सर्व कार्यक्रम यशस्वी होत आहे.नुकताच जॉन डियर ट्रॅक्टर कंपनी साठी निवेदक सुरेश साळुंकेंनी एक यशस्वी कार्यक्रम केला.पारस इलेक्ट्रॉनिक्सने आयोजित केलेल्या अपर्णा कंपनीच्या डिलरच्या गेटटुगेदरचे बहारदार निवेदन केल्याबद्दल अपर्णा इलेक्ट्रॉनिक्स कंपनीचे ओनर मनोज जैन , पारस छाजेड , अभय छाजेड यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. होम मिनिस्टर स्मार्ट मिनिस्टरसह सर्वंच कार्यक्रम यशस्वी करत आसल्याबद्दल समाजातल्या सर्वच क्षेत्रातील सर्व लोक निवेदक सुरेश साळुंकेंचे अभिनंदन करत कौतुक करत आहे.हे सर्व यश माझ्या बाई बाचे ( आई वडिलांचे ) आहे असं निवेदक सुरेश साळुंके म्हंटल्यामुळे त्यांचा चाहता वर्ग आणखी खुष होत आहे.

## शिक्षणासोबत संस्कारांची जोड हीच खऱ्या यशाची गुरुकिल्ली – डॉ. योगेश क्षीरसागर




पाटोदा, दि.१२ (प्रतिनिधी) - विनायक युवक कल्याण संस्था, बीड संचलित प्रियदर्शनी कन्या प्रशाला, पाटोदा यांच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम बुधवारी रेणुका माता मंदिर येथे उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते झाले.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. क्षीरसागर म्हणाले, शिक्षणासोबत संस्कार आणि व्यक्तिमत्त्व विकासाची जोड दिल्यास विद्यार्थिनी आयुष्यात निश्चित यशस्वी होतात. विद्यार्थिनींनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांतून आत्मविश्वास, कलागुण आणि शिस्तीचे उत्कृष्ट दर्शन घडले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमास नगराध्यक्षा सौ. दीपालीताई जाधव, भागवतराव येवले, मा. नगरसेवक संदीप जाधव, राजू जाधव, शिवभूषण जाधव, शाम हुले, याह्याभाई चाऊस, मिठुशेठ कांकरिया, दर्शनशेठ कांकरिया, संस्थेचे प्रशासक डॉ. व्ही. टी. देशमाने, डॉ. सुधाकर गुट्टे, मुख्याध्यापक सचिन खोले, नवनाथ ढाकणे तसेच मान्यवर उपस्थित होते.

# किशोरी इंग्लिश स्कूलने केली चंपावती महोत्सवात दहा पारितोषिकांची कमाई

**ाचार्य एम.आर.बिर्ला या सर्वोत्कृष्ट मुख्याध्यापक पुरस्काराने सन्मानित**



बीड दि १२ (प्रतिनिधी )-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे महाकरंडक चंपावती महोत्सवात किशोरी इंग्लिश स्कूल, बीड च्या १२० विद्यार्थांनी भाग घेत पुरस्कारांची लयलूट करत तब्बल १० बक्षिसे पटकावून किशोरी इंग्लिश स्कूलचे नाव उंचावले. या यशाबद्दत शाळेच्या चालिका डॉ. अदिती सुभाषचंद्र सारडा यांनी चिमुकल्या बालकलाकारांच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकली.

किशोरी इंग्लिश स्कूलच्या प्राचार्य एम.आर.बिर्ला यांना सर्वोत्कृष्ट मुख्याध्यापक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शाळेच्या संस्था चालिका डॉ.अदिती सुभाषचंद्र सारडा यांनी मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. डॉ. अदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाने आणि पाठिंब्याने हे सगळे शक्य झाले. या स्पर्धेत समूहनृत्यामध्ये लावणी डान्सला प्रथम, महाभारत गाण्याला द्वितीय, आणि राजस्थानी गाण्याला तृतीय पारितोषिक मिळाले. जोडी नृत्यामध्ये साऊथ इंडियनला द्वितीय तर मराठी गाण्याला तृतीय पारितोषिक मिळाले. समूहगीत गायनाला तृतीय तर वैयक्तिक गीत गायनाला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. चित्रकला आणि एकपात्री अभिनयामध्येही उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. किशोरी इंग्लिश स्कूलच्या चालिका डॉ.अदिती सुभाषचंद्र सारडा या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला नेहमीच प्राधान्य देतात.

## तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाइनचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा जल्लोषात संपन्न

बीड दि.१२ (प्रतिनिधी) - देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड येथील वार्षिक स्नेहसंमेलन बुधवार, दि. ११ रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात अत्यंत दिमाखात आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या सोहळ्याचे उद्घाटन के.एस.के. महाविद्यालयातील नाट्यशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रो.डॉ. दुष्यांता रामटेके यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुलसी महिला मंडळाच्या अध्यक्षा मा. दीपा रोडे होत्या. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून अभिनेते डॉ.ड.महेश वनवे, सुप्रसिद्ध पॅथॉलॉजिस्ट डॉ.रेश्मा गवते, त्वचारोग तज्ज्ञ डॉ. सोनल घनघाव, प्रा.अर्जुन राठोड, डॉ.सुनिल जोंधळे, प्रा.डी.जी. निकाळजे, डॉ. विजयकुमार बांदल, प्रा.डी.डी. राऊत, प्रा.प्रकाश ढोकणे आणि प्राचार्य डॉ.अश्विनी बेद्रे यांची उपस्थिती होती.

# निरपराध शिक्षकांवर गुन्हे दाखल करू नयेत-मराठवाडा शिक्षक संघाचे निवेदन

बीड (प्रतिनिधी): शालांत माध्यमिक उच्च माध्यमिक परीक्षा कॉपीमुक्त घेण्यासाठी मंडळ,शिक्षण विभाग,प्रशासना इतकेच ही परीक्षा पार पाडणारे शिक्षकही प्रयत्नशील आहेत. मात्र परीक्षा केंद्राबाहेर लोक जमतात यास शिक्षकास जबाबदार धरून निरपराध शिक्षकांवर गुन्हे दाखल करू नयेत अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाने केली आहे. याबात अधिक माहिती अशी की,१० फेब्रुवारीपासून शालांत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस सुरवात झाली आहे. कॉपीमुक्त परीक्षा घेण्याचे परीक्षा मंडळ, शिक्षण विभाग आणि जिल्हा प्रशासनाचे प्रयत्न कौतुकास्पद आणि अभिनंदनीय आहेत. त्यासाठी प्रत्येक परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत.

काल दिनांक ११ फेब्रुवारी रोजी चौसाळा केंद्र परिसरात बाहेरून नागरिक जमा झाल्याचे निष्पन्न झाले आहेत. त्यावरून केंद्र संचालकासह सतरा शिक्षकांवर गुन्हे दाखल झाल्याच्या बातम्या वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झाल्या आहेत. वास्तविक पहाता परीक्षा केंद्रावर बाहेरून बंदोबस्त करण्याची जबाबदारी पोलीस प्रशासनावर असते, त्यासाठी शिक्षकांना जबाबदार धरणे अन्यायकारक आहे. कॉपीसाठी करणारे व त्यासाठी मदत करणारांवर कायदेशीर कारवाई झालीच पाहिजे परंतु परीक्षा चालु असताना परीक्षा केंद्रावर बाह्या घटक धहशत माजवतात, शिक्षकांवर दबाव आणतात. परीक्षा दालनात आणि बाहेर शिक्षकांना कुठलेही संरक्षण नाही. कोणत्याही शिक्षकास आपल्या विद्यार्थ्यांनी कॉप्या कराव्यात असे वाटत नाही. त्यामुळे कॉपी प्रकरणात पोलीस कारवाई करण्यापूर्वी पूर्णतः खातरजमा करावी. कोणत्याही निरपराध शिक्षकांवर कारवाई होवू नये. तसे झाल्यास शिक्षकांची बदनामी होईल व त्यांचे मानसिक खच्चीकरण होईल. त्यामुळे कॉपी प्रकारा बाबत गुन्हे दाखल करण्यापूर्वी काटेकोरपणे चौकशी करावी आणि मगच दोषींवर गुन्हे दाखल करावेत. कोणत्याही परिस्थितीत निरपराध शिक्षकांवर गुन्हे दाखल करण्यात येवू नयेत अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम, माजी जिल्हाध्यक्ष डी.जी.तांदळे, जिल्हाध्यक्ष कालिदास धपाटे, जिल्हा सचिव गणेश आजबे , केंद्र कार्यकारिणी सदस्य बंडू आघाव, अशोक मस्कले, नामदेव काळे, सुभाष शेवाळे, विजय गणगे, परवेज देशमुख, व्यंकटराव धायगुडे, हनुमंत घाडगे, गोवर्धन सानप, मनोज सातपुते, तावरे डी. एम, दिनकर शिंदे, युवराज मुरूमकर, विनोद सवासे, अनुप कुसुमकर, श्रीधर गुट्टे, सुमंत गायकवाड, विष्णू वळेकर, प्रदीप चव्हाण, हेमंत धानोरकर, शेख आय. जे, एम.डी. डोळे, अशोक अशोक गाडेकर, शिवाजी ढोबळे, जीवनराव थोरात, बाळासाहेब टिंगरे, दादासाहेब घुमरे, बाळासाहेब काळुशे, शामसुंदर साळुंके, सुनिल जाधव, श्रीनिवास काकडे, हनुमंत गवारे, तुळशीदास सोळंके, जगदिश्चंद्र प्रेमचंद तोष्णीवाल, नदीम युसूफ, पुरुषोत्तम येडे पाटील, संजय गोरे, अलिशान काझी, सुनिल नागरगोजे, बी. टी. खाडे यांनी केले आहे. यांनी शालेय शिक्षणमंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.


## विभागीय वन अधिकारी, बीड यांचे कार्यालय

खासबाग, लेंडी रोड, बीड – ४३११२२

Email ID : dobeed1@gmail.com

वृक्षवल्ली आम्हा सोयरे नवरचे

### ई–निविदा सूचना क्र.०२/२०२५–२०२६

विभागीय वन अधिकारी, बीड वनविभाग, बीड यांचे वतीने धारुर वन परिक्षेत्रातील खालील कामांसाठी खुल्या प्रवर्गातील पात्र नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन ई निविदा मागविण्यात येत आहेत. त्या मधील कामाचा तपशील खालील प्रमाणे.

| निविदा क्र. | कामाचे ठिकाण | कामाचे नांव | वन परिक्षेत्र | प्रत्यक्ष कामाची अंदाजपत्रकिय रक्कम रुपये | बयाणा रक्कम रुपये (१%) | काम करण्याची कालमर्यादा | कोऱ्या निविदा नमुन्याची किंमत रुपये | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | मौजे घागरवाडा येथील रोपवन फॉ.स.नं.६३ क्षेत्र २० हे.ता. धारुर जि.बीड. | Providing and erecting 1.65 mt high Chainlink Fencing with Main Gate & Wicket Gate to Plantation (20 Ha. Area) at Ghagarwada in F.C. No. 406 in F. Survey No. 63 in Ghagarwada Beat in Dharur Round in Dharur Range of Forest Division, Beed. | धारुर | ३८३७७०१ | ३८३७७ | आदेश दिलेल्या दिनांकापासून ३० दिवसाचे आत | १०००.०० | शासकीय नियमाप्रमाणे |

उपरोक्त कामाबाबत ई– निविदा कार्यप्रणालीद्वारे निविदा भरणेची दिनांक, निविदेचा नमुना, निविदेसंबंधी ईतर तपशील खालील प्रमाणे देण्यात आलेला आहे.

कामाची सविस्तर निविदा सुचना व कोरे निविदा फॉर्म www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून **दि.१३.०२.२०२६ रोजी दुपारी १२.०० ते दि. २०.०२.२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत** भरता येतील.

१. निविदा **दि.२३.०२.२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता** विभागीय वन अधिकारी, बीड वनविभाग यांचे कार्यालय बीड येथे उघडण्यात येतील. निविदा उघडण्याचा दिनांक सोईनुसार पुढे ढकलण्याचा अधिकार विभागीय वन अधिकारी, बीड वन विभाग, बीड यांनी राखुन ठेवला आहे.

२. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार विभागीय वन अधिकारी, बीड वनविभाग, बीड यांनी राखुन ठेवला आहे व त्यांचा निर्णय सर्व निविदाधारकांसाठी अंतिम व बंधनकारक राहील.

३. निविदा संबंधी सविस्तर अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर **दिनांक १३.०२.२०२६ रोजी १२.०० ते दिनांक २०.०२.२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत** पहावयास मिळतील.

**जिमाका/बीड/जाहि/२०२५–२६/२५२**

**स्वा/–**
**विभागीय वन अधिकारी, बीड**



**दै.पार्श्वभूमी,बीड** Date-13/02/2026

**CHANGE IN NAME**

I DECLARED BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME OF

**OLD NAME - SHAIKH PASHA SHAIKH HASAN**

**New Name : PASHA HASAN ATTAR**

Address-Near Idgah Masjid Idgah Mohalla Manjlegaon Po.Majalgaon Dist.Beed Maharashtra 431131


## जाहीर प्रगटन

विशेष करुन मौजे नवगन राजुरी येथील तमाम जनतेस व बीड तालुका व परिसरातील जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल नामे **कांताबाई बाबु शिंदे, रा. राजुरी नवगण ता.जि.बीड, ह.मु. चिंचोली, ता. भुम जि.धाराशिव** यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन व दाखवलेल्या कागदपत्रावरुन सर्वांच्या माहिती करीता हे जाहीर प्रगटन देत आहे की, माझे अशिलाचे मालकी व ताब्यातील मिळकत मौजे नवगन राजुरी ता.जि.बीड येथील गट नं. ५०५, मध्ये जमीन असुन, त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. पुर्वेस नाना बहिर व विष्णु गवळी यांची जमीन, पश्चिमेस - राहिंज यांची जमीन, दक्षिणेस राहिंज यांची जमीन, उत्तरेस राजुरी बीड रस्ता अशी चतुःसिमा आहे.

वरील मिळकती बाबत माझे अशीलाने कांताबाई पि. गणपत हरिभाऊ व सखाराम हरिभाऊ शिंदे व इतर यांचे विरुध्द बीड येथील दिवाणी न्यायाधीश व स्तर बीड यांचे न्यायालयात दावा दाखल केला असुन, सदर दाव्याचा क्र. एम.ए. नं. ५८/२०२६ असा असुन, सदर दावा प्रलंबीत आहे.

सदर मिळकती मध्ये माझे अशलाचे हित गुंतलेले असुन, सदर जमीन ही माझे अशीलाचे मालकी व ताब्यात आहे. परंतु सदर जमीनी मध्ये प्रतिवादीचे काहीही हक्क संबंध नसताना देखील प्रतिवादी सदरचे जमीनी बाबत आर्थिक व्यवहार करण्याचे प्रयत्नात आहेत.

त्यामुळे उपरोक्त मिळकतीचा हस्तांतरण, खरेदी विक्रीचा कोणताही व्यवहार करु नये. तसा व्यवहार केल्यास तो जाहीर प्रगटन देणार यांचेवर बंधनकारक राहणार नाही. जर कोणी सदर मिळकती बाबत कसल्याही प्रकारचे हस्तांतरण, खरेदी-विक्रीचा व्यवहार केला तर त्यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, व त्याची सर्वस्वी जबाबदारी व्यवहार करणारावर राहील, याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन.

**मार्फत –**
**ॲड. एस.एस.सावंत, बीड.**
मो.नं. ९४२३५६३३८५

**– जाहीर प्रगटन देणार –**
**कातांबाई बाबु शिंदे**
**मो. ९०८२४६८३०७**

## जाहीर प्रगटन

**मा.सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर पाटोदा, ता.पाटोदा जि.बीड यांचे न्यायालयात**

किरकोळ दि.अर्ज ५८/२०२६ तृप्ती व ईतर विरुध्द निरंक मार्फत : श्रीमती एस.एम.गर्जे.

ज्यापेक्षा सुनंदा पि. गंगाराम थोरवे, हे दिनांक १४/१०/२०२५ रोजी मयत झाले असुन खालील अर्जदार हे त्यांचे वारस आहेत.

**१) तृप्ती भ्र.अभिमान खाडे,** वय २५ वर्षे, धंदा घरकाम. **२) नवनाथ पि. शाहुराव सानप,**वय ३२ वर्षे, धंदा शेती

**अर्जदार क्र.१** यांचा पत्ता रा. करंजवन, ता. पाटोदा जि. बीड. **अर्जदार क्र.२** यांचा पत्ता रा. थेरला, ता. पाटोदा जि. बीड ह.मु. बाजीप्रभु चौक, जोतिबा नगर, काळेवाडी, पुणे शहर पुणे

ज्याअर्थी, अर्जदार क्र १ ही मयताची विवाहित मुलगी असुन अर्जदार क्र २ हा मयताचा पती आहे. या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत **सुनंदा पि. गंगाराम थोरवे,** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०४/०२/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. **पु.ता.२५/०३/२०२६.**

आदेशावरुन
क.लिपीक
सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय
क.स्तर, पाटोदा ता.पाटोदा जि.बीड.

## जाहीर प्रगटन

**मा.श्री.अ.सं.जगताप, दिवाणी न्यायाधिश क.स्तर शिरूर का. यांचे न्यायालयात**

कि.दि.अर्ज३४/२०२६ द्रोपदी घ.आन्ना इंगळे वगैरे वि.निल मार्फत :ॲड.डी.एन.पारगांवकर,

**अर्जदार :** १. द्रोपदी भ्र.आन्ना इंगळे, वयः ७८ वर्षे, धंदाः घरकाम, रा. पाडळी ता. शिरूर का. जि.बीड. २. कुसूम भ्र. रघुनाथ इंगळे, वयः ५५ वर्षे, धंदाः घरकाम, रा. पाडळी ता. शिरूर का. जि.बीड ह.मु. ब्राम्हण फलीया, सिलवासा, दादरा व नगर हवेली ता.जि.दादरा व नगर हवेली. ३. प्रियंका पि. रघुनाथ इंगळे, वयः ३३ वर्षे, धंदा घरकाम, रा.सदर. ४. मोनिका पि. रघुनाथ इंगळे, वयः ३० वर्षे, धंदाः घरकाम, रा. पाडळी ता. शिरूर का. जि.बीड ह.मु. ब्राम्हण फलीया, सिलवासा, दादरा व नगर हवेली ता.जि.दादरा व नगर हवेली. ५. विश्वनाथ पि. रघुनाथ इंगळे, वयः २७ वर्षे, धंदाः शेती रा. पाडळी ता.शिरूर का जि.बीड ह.मु.ब्राम्हण फलीया, सिलवासा, दादरा व नगर हवेली ता.जि.दादरा व नगर हवेली

**अर्ज :** मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार बारस प्रमाणपत्र मिळणेबाबत.

ज्यापेक्षा मयत नामे **रघुनाथ पि. अन्ना इंगळे** मौजे पाडळी ता. शिरूर का. जि. बीड येथील रहिवाशी होते व ते दिनांकः १७/०८/२०२४ रोजी ब्राम्हण फलिया, सिलवासा, दादरा एवं नगर हवेली ता.जि.दादरा एवं नगर हवेली याठिकाणी मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयताची आई असून अर्जदार नं. २ ही मयताची पत्नी आहे. तसेच अर्जदार नं. ३ व ४ हया मयताच्या विवाहित मुली असून अर्जदार क्र ५ हा मयताचा मुलगा आहे. या अर्जदारांव्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही, असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार उपरोक्त मयत यांचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदर अर्जदाराच्या हक्काबाबत लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क साबीत दिसल्यास अर्जदारांना सदरह **मयत रघुनाथ पि. अन्ना इंगळे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दि.१०/०२/२०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख: २७/०९/२०२६** ही आहे.

आदेशावरुन
क.लिपीक
सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय
क.स्तर, शिरुर (कासार)

# पार्श्वभूमी



## महिला शक्ती प्रतिष्ठानच्या वतीने शैक्षणिक साहित्याचे वाटप

लिंबागणेश दि.१२(प्रतिनिधी):- पुण्याच्या कात्रज येथील महिला शक्ती प्रतिष्ठाणच्या वतीने बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे नुकतेच वाटप करण्यात आले.

आयोजीत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य किसन सावंत हे उपस्थीत होते. यावेळी प्रतिष्ठानच्या अध्यक्षा आरती गणाचार्य, विश्वस्त अरुण गणाचार्य, उर्मिला मानकर , डॉ. कृष्णा मानकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, कंपास बॉक्स व वह्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी उपक्रम पाहुन प्राचार्य सावंत यांनी महिला शक्ती प्रतिष्ठानच्या सामाजिक बांधिलकीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी माजी प्राचार्य दत्तात्रय मानकर यांनी विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास करण्याचे व दिलेल्या साहित्याचा योग्य उपयोग करण्याचे आवाहन केले.पुण्याच्या कात्रज येथील महिला शक्ती प्रतिष्ठाणच्या वतीने बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे नुकतेच वाटप करण्यात आले.यावेळी शाळेतील शिक्षकवृंद, कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अशा उपक्रमांमुळे शैक्षणिक बळ मिळत असून समाजातील दानशूर व्यक्ती व संस्थांनी पुढाकार घेणे गरजेचे असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळा प्रशासन व महिला शक्ती प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## एकटी पाहून महिलेचा विनयभंग

केज दि १२(प्रतिनिधी):- केज तालुक्यातील एका गावातील महिलेला शेतात एकटीला पाहून तिच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य करून तीचा विनयभंग केल्या प्रकरणी पिडीत महिलेच्या फिर्यादी वरून सुग्रीव मुंडे रा. मुंडेवाडी याच्या विरुद्ध केज पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.मंगळवार दि.१० फेब्रुवारी रोजी सायंकाळी खरमाटा शिवारात पिडीत महिला एकटी पाहून सुग्रीव मुंडे रा. मुंडेवाडी याने तिच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य करून तीला शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देऊन पिडीत महिलेचा विनयभंग केला. पिडीत महिलेच्या फिर्यादी वरून सुग्रीव मुंडे रा. मुंडेवाडी याच्याविरुद्ध केज पोलिसात विनयभंग केल्याचा गुन्हा नोंद झाला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शना खाली सहाय्यक पोलिस निरीक्षक उप निरीक्षक बालासाहेब सानप हे पुढील तपास करीत आहेत.

## उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या उपस्थितीत आ.धस यांची सह्याद्रीत विकासावर निर्णायक बैठक

पाटोदा दि.१२(महेश बेदरे):- मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहात गुरुवारी बीड जिल्हा नियोजन समितीची महत्त्वपूर्ण बैठक मा. पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर आयोजित ही पहिलीच बैठक असल्याने तिला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

बैठकीत जिल्ह्यात सुरू असलेल्या विविध विकासकामांचा, पायाभूत सुविधा प्रकल्पांचा तसेच शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा सखोल आढावा घेण्यात आला. प्रलंबित कामे निश्चित मुदतीत पूर्ण करावीत, निधीचा पारदर्शक व परिणामकारक वापर व्हावा आणि प्रत्येक योजनेचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचावा, अशा स्पष्ट सूचना उपमुख्यमंत्र्यांनी दिल्या. शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, रस्ते, कृषी आणि सामाजिक क्षेत्रातील योजनांना अधिक गती देण्यावर भर देण्यात आला.

पान २ वर



### नेकनूर पोलिसांच्या कारवाईत पावणे तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

## सिमेंटच्या गोणीतून गांज्याची तस्करी ; दोघे ताब्यात



बीड दि १२ (प्रतिनिधी) -नेकनूर पोलिसांनी गांज्याची तस्करी करणारे रॅकेट बुधवार दि.११ च्या रात्री उघडकीस केले आहे. सिमेंटच्या गोणीतून गांज्याची तस्करी करण्यात येत असल्याची माहिती मिळाल्या वरून सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांनी एका शेतात छापा मारून याचा फर्दाफाश केला. या कारवाईत ११ किलो १५० ग्रॅम गांजा ज्याची किंमत २ लाख ७८ हजार ७५० रुपयांच्या घरात असल्याची माहिती आहे. नेकनूर पोलिसांनी यावेळी दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल केले.

नेकनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हिंगणी बुद्रुक गावात एका उसाच्या शेतात सिमेंटच्या गोणीत गांज्या भरून ठेवण्यात आला होता. याची माहिती नेकनूर पोलिसांना झाल्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी व त्यांच्या टीमने छापा मारला. यावेळी शेतात दोन सिमेंटच्या गोणीत ११ किलो १५० ग्रॅम गांज्या पोलिसांना सापडला.या गांज्याची तस्करी होणार असतानाच पोलिसांनी गुमानसिंग शिवराम पावरा (वय-३५,रा.बोरमल्ली पाडा, ता.शिरपूर,जि.धुळे) व मनोज सीताराम मेहता (वय१९,रा. बाखरली, ता.वरला, जि.बडवानी राज्य.मध्यप्रदेश) या दोघांना रंगेहात पकडले आहे. नेकनूर पोलीस ठाण्यात दोन्ही आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला असून याप्रकरणा चा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आहेर हे करीत आहेत.

### माजलगावात आता कहर झाला

## साड्या वाटपाचे आमिष दाखवून भर दिवसा वृद्ध महिलेला लुटले

माजलगाव (प्रतिनिधी) साड्या आणि रोख रक्कम वाटपाचे आमिष दाखवून दोन अज्ञात भामट्यांनी एका ६५ वर्षीय वृद्ध महिलेला भरदिवसा लुटल्याची धक्कादायक घटना माजलगाव शहरात घडली आहे. मंगळवार, १० फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी पावणे बारा वाजेच्या सुमारास नवीन बसस्थानक परिसरातील एसबीआय बँकेसमोर ही घटना घडली. सत्यभामा बाबासाहेब कदम (वय ६५, रा. शिवाजीनगर) या बँकेत जात असताना, दोन भामट्यांनी त्यांना गाठून ७ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला.

सत्यभामा कदम या घरकाम करून आपला उदरनिर्वाह करतात. मंगळवारी सकाळी त्या कामानिमित्त एसबीआय बँकेत जात होत्या. यावेळी दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांना वाटेत थांबवले. शिवाजी महाराज चौकात साड्या आणि १५ हजार रुपयांचे वाटप सुरू आहे, तुम्ही आमच्यासोबत चला, असे सांगून या भामट्यांनी त्यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर या चोरट्यांनी त्यांना जवळच असलेल्या माऊली स्वीटमार्टच्या बोळातील एका ओट्यावर नेऊन बसवले. तिथे बोलण्यात गुंतवून शिताफीने त्यांच्या गळ्यातील ३ ग्रॅमचे सोन्याचे मणी, २ ग्रॅमची सोन्याची फुले, एक मोबाईल आणि रोख १ हजार रुपये असा एकूण ७ हजार

पान २ वर

## ऊसतोड मजुराच्या अल्पवयीन मुलीवर दोन वेळा अत्याचार करणाऱ्या ट्रॅक्टर चालकाला अटक करा

केज दि १२ (प्रतिनिधी) -परभणी जिल्ह्यातून ऊसतोड मजूर म्हणुन केज तालुक्यात आलेल्या ऊसतोड मजुराच्या १३ वर्षीय अल्पवयीन मुलीवर त्याच ऊसतोड टोळीच्या ट्रॅक्टर चालकाने. कोयत्याचा धाक दाखवून केज तालुक्यातील सुर्डी व हादगाव शिवारात दोन वेळा बलात्कार केल्याची खळबळजनक घटना घडली असून, नराधम ट्रॅक्टर चालक आरोपी विरुद्ध युसूफ वडगाव पोलिसात पॉक्सो आणि बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फरार झालेल्या ट्रॅक्टर चालकाला त्वरित अटक करा अशी मागणी ऊसतोड मजुरांमधून करण्यात आली.

परभणी जिल्ह्यातील व जिंतूर तालुक्यातील एका खेडेगावातील ऊसतोड मजूर केज तालुक्यात ऊसतोडीच्या कामासाठी मजूर म्हणुन आला असून त्याच्या कुटुंबातील १३ वर्ष ८ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीला त्याच ऊसतोडीचा ट्रॅक्टरचालक सूरज अशोक खरात रा. जामरुन, चारठाणा ता. जिंतूर जि. परभणी याने कोयत्याने जीवेमारण्याचा धाक दाखवून दि. १४ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजण्याच्या दरम्यान सुर्डी (सोने सांगवी) शिवारातील रोडगे यांचे शेतातील कोपीत व दि.८ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजण्याच्या दरम्यानपुन्हा हादगाव (डोका) शिवारातील बनसोडे यांचे शेतात कोयत्याचा धाक दाखवून बळजबरीने शारीरिक संबंध प्रस्थापित केला.या प्रकरणी पीडितेच्या आईच्या फिर्यादी वरून मंगळवार दि.१० फेब्रुवारी रोजी रात्री उशिरा ट्रॅक्टर चालक सूरज अशोक खरात याच्या विरुद्ध युसुफवडगाव पोलिस ठाण्यात पोस्को अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गून्हा दाखल

पान २ वर

## जाहीर प्रगटन

दि.१२/०२/२०२६

**विद्यमान दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)**

**नियमित दिवाणी दावा क्र.: ८३ / २०२६**

**विठ्ठल रामभाऊ आंधळे..वादी**

**विरुद्ध**

**उषाताई महादेव गर्जे.प्रतिवादी**

या जाहीर नोटीसद्वारे आपण प्रतिवादी, सौ.उषाताई महादेव गर्जे वय: ७२ वर्ष,रा.गाव सांगवी,ता.पाटोदा, जि. बीड.

यांना या नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, वरील वादी यांनी मा. न्यायालयात तुमच्या विरुद्ध मौजे गारखेडा (शहरी), ता. व जि. छत्रपती संभाजीनगर येथील गट नं. ३६/२ मधील श्री भगवानबाबा नगर या ले-आउटमधील १५.१७ आर क्षेत्र जमिनीसंदर्भात, तुम्हाला व तुमच्या प्रतिनिधींना हस्तांतरण किंवा अडथळा निर्माण करण्यापासून रोखण्यासाठी कायमस्वरूपी मनाई हुकूम मिळण्याबाबत सदर दावा दाखल केला आहे.

आणि ज्याअर्थी, माननीय न्यायालयाने आदेशित केल्यानुसार तुम्हाला या जाहीर प्रगटनाद्वारे सूचित करण्यात येते की , तुम्ही स्वतः किंवा तुमच्या कायदेशीर वकिलामार्फत दिनांक: १६.०२.२०२६ रोजी या न्यायालयात (८ वे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औरंगाबाद) हजर राहून आपला लेखी जबाब (Written Statement) दाखल करावा व अर्जदाराचे अर्जाप्रमाणे हुकूम का करू नये या विषयाचे कारण दाखवावे. सदरहू प्रमाणे हजर होऊन कारण न दाखविल्यास अर्जदाराचे अर्जाप्रमाणे किंवा कोर्टास योग्य वाटेल तो हुकूम केला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/०२/२०२६ रोजी माननीय न्यायालयाच्या आदेशावरून प्रसिद्ध केले.

स्वाक्षरी,
**अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर),
छत्रपती संभाजीनगर

(न्यायालयाचा शिक्का)

### ट्रॅक्टर पलटी झाल्याने अपघात

## शेतमजूर तरुणाचा मृत्यू

माजलगाव (प्रतिनिधी) तालुक्यातील हिवरा (बु.)येथे शेतीच्या वळण रस्त्यावर ट्रॅक्टर वळवताना ट्रॅक्टर पलटी झाले आहे.या अपघातात एका २८ वर्षीय तरुण ट्रॅक्टर चालक शेतमजुराचा अंगावर ट्रॅक्टर पडल्याने दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी पहाटे घडली. याबाबत समजलेली माहिती अशी की,तालुक्यातील हिवरा (बु)येथील शेतमजूर तरून गणेश भारत गाडे (वय २८ रा.हिवरा बु माजलगाव) शेतातील कामासाठी ट्रॅक्टर चालवत जात होता.यावेळी शेत वळण रस्त्यावर ट्रॅक्टरला टर्न मारत असताना ट्रॅक्टर पलटी झाले.या झालेल्या अपघातात ट्रॅक्टर अंगावर पडल्याने गणेश गाडे याचा जागीच मृत्यू झाला असल्याची प्राथमिक माहिती आहे.ही घटना गुरुवारी पहाटे २ वाजण्याच्या दरम्यान झाल्याचा अंदाज आहे.दरम्यान स्थानिक नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन जखमी तरुणाला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले ;मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.या घटनेमुळे हिवरा(बु.)गावात शोककळा पसरली आहे.मृत तरुण शेतमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असल्याची माहिती आहे.अचानक झालेल्या या घटनेमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असुन घटनेची नोंद ग्रामीण पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.पुढील तपास सुरू आहे.








## जाहिर नोटीस

दि.१२/०२/२०२६

**प्रति,**
**मा.सदस्य श्री/सौ. सर्व सन्मानीय नगरसेवक**
**माजलगांव विकास आघाडी**
**नगर परिषद माजलगांव जिल्हा बीड**

**स.महोदय,**

आघाडी प्रमुख मा.सहालबीन आमेर चाऊस यांचे दिनांक ११/०२/२०२६ प्राप्त वेळ सायंकाळी ०७:०० चे आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, माजलगांव विकास आघाडी विशेष बैठक माजलगांव विकास आघाडी यांचे नियमावलीनुसार गट नेता श्री.इम्रान आगा खान यांचे अध्यक्षतेखाली नियमावलीतील तरतुदी अनुसरून व नगर परिषद अधिनियम १९६५ च्या कलम ८१ मधील तरतुदीशी अनुसरून दिनांक १५/०२/२०२६ रोजी सकाळी १० : ०० वाजता माजलगांव विकास आघाडी तथा आघाडीचे गट नेता यांचे कार्यालय संन्मीत्र कॉलनी, पॉवर हाऊस रोड माजलगांव ता.माजलगांव जि.बीड या ठिकाणी आघाडीचे कामकाज सुसुत्रता राखनेसाठी आणि गट नेतेच्या निवडी बाबत फेर विचार करण्यासाठी,आयोजीत केली आहे.

तरी आपणास उपस्थित राहाणेची विनंती करण्यात येत आहे. ही नोटीस गटातील सर्व सदस्यांना आघाडीचे नियमावली मधील माध्यमाद्वारे देण्यात येत आहे.

**सभेचा दिनांक : १५/०२/२०२६**
**सभेचा वेळ : सकाळी १० : ०० वाजता**
**सभेचा ठिकाण : संन्मीत्र कॉलनी, पॉवर हाऊस रोड, माजलगांव, ता.माजलगांव, जि.बीड**
**दिनांक : १२/०२/२०२६**
**ठिकाण : माजलगांव**

**इम्रान आगा खान**
**गट नेता माजलगाव विकास आघाडी नगर परिषद माजलगांव.**

प्रतिलिपी,
जिल्हाअधिकारी बीड माहितीस्तव सादर.

## चकलांबा येथील पंचाळेश्वर महादेव मंदिरात आजपासून शिवरात्रीमहोत्सव

बीड दि.१२ (प्रतिनिधी):गेवराई तालुक्यातील चकलांबा येथे प्रतिवर्षाप्रमाणे गुरुवार दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ पासून चार दिवसीय शिवरात्री महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या शिवरात्री महोत्सवात नामांकित कीर्तनकार हजेरी लावणार आहेत. तर दुपारी ह.भ.प. कैलास महाराज खेडकर यांची दुपारी २ ते ४.३० वाजता शिवलीलामृत कथा होणार आहे. शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. वैभव महाराज जगताप यांचे कीर्तन, शनीवार दि.१४ रोजी धुराजी महाराज कोळेकर, यांचे कीर्तन, तर रविवार दिनांक १५ फेब्रुवारी रोजी रात्री ८ ते १० वेळात ह.भ.प. शिवाजी महाराज फुंदे, फुंदेटाकळी यांचे कीर्तन होणार आहे. सोमवार दि.१६ रोजी सकाळी ११ ते १ यावेळेत ह.भ.प.डॉ. गणेश महाराज शास्त्री, महंत दुर्गाशक्तीगड, भिलवडे यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे.

शिवरात्री महोत्सवाच्या या भव्य दिव्य विविध कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन चकलांबा ग्रामस्थांच्या करण्यात आले आहे.

CMYK